कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक
## Marathi Third Language

# 9

## इयत्ता नववी
### भाग - 2

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

**Karnataka Textbook Society (R.)**
6th Cross, Malleshwaram, Bengaluru - 560 003.

# अनुक्रमणिक

## गद्यविभाग


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखकाचे नाव | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6 | अक्षराचं मैत्र | चंद्रकुमार नलगे | ललित लेख | व्यक्तिमत्त्व विकास | 01 |
| 7 | आंतरराष्ट्रीय कृषीतज्ज्ञ - डॉ. खानखोजे | वीणा गवाणकर | चरित्र | देशप्रेम, जिज्ञासा | 06 |
| 8 | सागर कन्या – रुपाली रेपाळे | सुमेध वडावाला | साहस कथा | धाडस, जिद्द | 11 |
| 9 | फुलण्यात मौज आहे | प्रवीण दवणे | प्रेरणादायी कथा | उत्सुकता, कुतूहल | 17 |
| 10 | ते जीवनदायी झाड | भारत सासणे | पर्यावरणीय लेख | वृक्षप्रेम | 24 |


## पद्यविभाग


| अ.क्र. | कवितेचे नाव | कविचे नाव | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6 | निरोप | पद्मा गोळे | राष्ट्रभक्ती | स्वातंत्र्य, एकात्मता | 30 |
| 7 | मी डोलकर | शांता शेळके | कोळीगीत | श्रमसाफल्य | 35 |
| 8 | महाराणी कित्तूर चन्नम्मा | गोविंद केळकर | गौरव गीत | देशभक्ती | 40 |
| 9 | लाभले आम्हास भाग्य | सुरेश भट | गझल | भाषाप्रेम | 45 |
| 10 | संपर्क | आबासाहेब पाटील | ग्रामीण कविता | लढा, संघर्ष | 50 |


## पूरक वाचन


| अ.क्र. | कवितेचे नाव | कविचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 3 | तोत्तोचान | चेतना सरदेशमुख गोसावी | 55 |


## व्याकरण


| | | | |
|---|---|---|---|
| 5 | वृत्त | | 58 |
| 6 | वाक्प्रचार | | 63 |
| 7 | म्हणी | | 66 |
| 8 | निबंध | | 68 |
| 9 | मुद्यावरून गोष्ट | | 69 |
| 10 | प्रसंग लेखन | | 71 |
| 11 | संवाद लेखन | | 72 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

6

# अक्षरांचं मैत्रं

**चंद्रकुमार नलगे**

G8M4F7



**परिचय :-** नामदेव चंद्राप्पा नलगे (जन्म - 1935 ) जन्म गाव - भेडसगाव. त्यांचे शिक्षण एम. ए. मराठी आहे. तसेच साहित्य विशारद, प्रवीण (हिंदी). 'गस्त', 'अगीन फुल', 'शहाळी', 'देवाची साक्ष', 'काफीला' या कादंबऱ्या, 'अंगाई', 'पंढरीची वाट', 'सरकारी माणूस', 'फणसा खालचं घर'. 'कोणी घर देता का घर'! हे कथासंग्रह प्रकशित झाले आहेत. 'गावाकडची माती', 'ढळला रे दिन सखिया' हे ललित लेख संग्रह, 'भारतीय अमर कुमार कथा', 'झुळझुळ गाणी' हे बाल वाङ्‌मय, 'रातवा', 'आणखीन एक जन्म', 'असा कसा हा जन्म'आत्मचरित्र प्रसिद्ध. विंदा करंदीकर जीवन गौरव व आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार मिळाले आहेत.

'अक्षरांचं मैत्रं' हा पाठ 'ढळला रे दिन सखया' या त्यांच्या ललित लेखसंग्रहामधून संपादित करून घेतलेला आहे. वाचनामुळे माणूस घडतोव ग्रामीण जीवन समृद्ध करण्यासाठी लोकपरंपरा महत्त्वाच्या आहेत. हे येथे सांगितले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य– व्यक्तिमत्त्व विकास)**

सह्याद्रीच्या डोंगर रांगांमध्ये, डोंगर कपारीतलं माझं गाव शहरापासून 60 -70 मैलावर वसलेलं. शहरीवाऱ्याचं नाव सुद्धा नव्हतं. प्रचंड पावसामुळे गावाचा संपर्क कोणाशी व्हायचा नाही. अशा डोंगर कपारीत सातवीपर्यंतच्या शाळेत 'शाहूवाडी' या गावी शिक्षण झालं. अशा गावांमध्ये माझा जन्म झाला.बालपणात घरातल्या दळण,कांडण करताना गायिलेल्या ओव्यांनी गाण्यांनी बाल मनावर अनेक संस्कार कोरले गेले. यातून नात्यांचा बंध घट्ट होत गेला. साखरझोपेत असलेल्या प्रत्येकाला या ओव्यांच्या हळुवारतेने व लयबद्धतेमुळे जाग यायची.

भाताची सुगी म्हणजे आमच्या गावचे सोनेरी दिवस. या दिवसात बाहेरचे फिरस्ते येत आणि गाव जागवत राहत. भल्या पहाटेचा येणारा कुडबुड्या जोशी, टाळ,चिपळ्या वाजवत गाणारा वासुदेव, गोंधळगाणी म्हणणारे गोंधळी, डोंबारणींची घुंगराच्या तालावरची गाणी, पोवाडे गाणारे भाट, दांडगट जाड कापडांवर रंगवलेल्या चित्रांचे रामायण, महाभारतातील कथा सांगणारे काशी कापडवाले यांनी माझ्या मनाला भुरळ पाडली. जागे झालेले जग अनुभवताना एकरूप होऊन जाई. हे वातावरण मला खूप आवडत असे. सणासुदीला मुलींनी,

स्त्रियांनी म्हटलेली गाणी हा तर घरचाच वाण, घरात गाता गळा गुणगुणत राही आणि आपले ओठ थरथरू लागत अशा वातावरणात माझ्या बालमनावर अनेक संस्कार झाले.

गावात भजनाचा आवाज असायचा, रानामाळातून धनगराच 'सुंबरान मांडलं' धनगरी ओव्यांची आरोळी रात्रीच्या चांदण्यात ऐकायला मिळायची. सूरपेटी, मृदंगाची, टाळांची सुरावट, अभंग, गवळणी आणि भैरवी यामुळे बालमनाला अंतरिक संस्काराची जोड मिळायची. धार्मिक अध्यात्म याचे ज्ञान सहज मिळायचे पण त्यात कधी अंधश्रद्धा नसायची. गावात अनेक कला कौशल्य जोपासणारी माणसं असल्यामुळे कला-कौशल्याचा प्रभावही माझ्या आयुष्यावर पडलेला आहे. श्रावणात वाचल्या जाणाऱ्या पुराणकथा, दसऱ्यामध्ये होणारे देवभक्तांचे आध्यात्मिक कोडयातले बोलणे,त्याचबरोबर गावातील प्रसिद्ध कथाकार यामुळे अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. गावात श्रावण महिन्यापासून दसऱ्यापर्यंत अनेक ग्रंथ वाचले. जायचे ते वाचनाचे काम माझ्यावर पडल्यामुळे मी रामायण, महाभारत, पांडवप्रताप, रामविजय, हरीविजय, शिवलीलामृत इत्यादी ग्रंथ वाचून दाखवले. आणि याच वाचनामुळे मला पाचवीत असतानाच लेखन कलेची प्रेरणा मिळाली.

आमच्या प्राथमिक शाळेच्या गुरुजींमुळेच वाचन, लेखनाची सवय लागली.गावोगावच्या जत्रेत जाणं, कुस्त्यांचे फड पाहणे, कीर्तन ऐकण्यासाठी जाणे हे सुरु असायचे. शेजारच्या गावांमध्ये संत गाडगेबाबांचे कीर्तन असल्यामुळे आम्हा सर्वांना त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी जायचे होते तेव्हा गुरुजींच्या परवानगीने कीर्तन ऐकण्यासाठी आम्ही गेलो.परवानगी देताना गुरुजींनी आम्हाला एक अट घातली की; जे ऐकलेलं आहे त्यावरती पंधरा ओळी निबंध लिहून आणायचा. यामुळेच दुसरे दिवशी मी शाळेत गाडगेबाबांच्या कीर्तनावरती निबंध लिहून दाखवला. तो वाचून गुरुजींना अतिशय आनंद झाला. सर्व वर्गातून निबंध वाचून दाखवला व जपून ठेवला आणि शाळा तपासायला आलेल्या दिपोटी साहेबांना दाखवला व त्यांनी माझं कौतुक केलं. पाठीवर शाब्बासकीची थाप मिळाली आणि याच प्रेरणेमुळे मी लेखणी घेऊन लिहू लागलो.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS



वाचनाची आवड शाळेत गुरुजींनी लावल्यामुळे वाचनालयातील सक्तीने पुस्तक वाचणे. बालसभा घेणे. त्याच्यावरती चर्चा करणे याची सवय लागली.वाचनालयामध्ये मी साने गुरुजींचे 'धडपडणारी मुले' हे पुस्तक वाचलं. त्यांनी केलेली धडपड मनात रुतून बसली. गावातील श्री समर्थ वाचनालयातून पुण्याचा

'केसरी','शालापत्रक', नागपूरचं 'आनंद' मासिक, 'किर्लोस्कर' मासिके वाचायला मिळाली. यामुळे वाचनाचा माझ्यावरती खूप परिणाम झाला आणि मी अनेक पुस्तके लिहून लागलो.

शाळेच्या एकांकिका स्पर्धेसाठी गुरुजींनी मला प्रेरणा देऊन एकांकिका लिहिण्यास प्रोत्साहन दिले. मी मात्र आढेवेडे घेत शेतकऱ्यांच्या जीवनावर 'गळफास' नावाची एकांकिका लिहिली. त्यावेळी मी सातवी इयत्तेत शिकत होतो. लिहिलेली एकांकिका बसवल्यामुळे ती खूप गाजली. शाळेतले गुरुजी हे माझे प्रेरणास्थान झाले आणि इथूनच अक्षरांचं मैत्र जमलं.

गावात विविध कारणातून नाटके बसवली जात. त्या नाटकांचा प्रभावही माझ्यावरती झाला. याच नाटकांमध्ये मी स्त्री भूमिका, विनोदी भूमिका केल्या त्यामुळे माझ्या लेखन प्रेरणेला खूप उपयोग झाला. हायस्कूलच्या निबंध स्पर्धेमध्ये 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर मी अभ्यासपूर्वक निबंध लिहून पहिलं बक्षीस मिळवलं. श्री.म.माटे यांची 'बन्सीधर, आता तू कुठे रे जाशील' ही कथा अभ्यासायला होती. त्या कथेचा परिणाम माझ्या मनावर झाल्यामुळे मी लेखन, चिंतन सुरू करून श्री.म.माटेंसारखे आपल्याला लिहिता आले पाहिजे हा मनोभाव वाढत गेला. इयत्ता दहावीला असताना सरांनी हस्तलिखित अंक काढायचे ठरवले होते आणि याच हस्तलिखिताचा प्रमुख संपादक म्हणून माझी निवड झाली. 'भरारी' या नावाच्या शंभर पानी हस्तलिखिताचं लेखन करून घेताना मला खूप फायदा झाला ते करत असताना अनेक वेगवेगळे अनुभव आले.त्यामुळे माझं सरांनी कौतुकही केलं त्याचवेळी सरांनी माझे भविष्य वर्तवले होते की तू पुढे चांगला लेखक,संपादक होशील.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

त्यांनी वर्तवलेले भविष्य खरे ठरले आणि माझे पहिलं पुस्तक 'गळफास' हे छापील स्वरूपात आल्यामुळे 1953 साली गावकऱ्यांनी माझा सत्कार केला आणि या एकांकिका पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचे पारितोषिक मिळाले. मला पुढील शिक्षणाच्या खर्चाची पर्वणी म्हणून लोक माणसातली थैली अर्पण केली. त्यामुळे माझा ऊर आनंदाने भरून आला. बाळपंखात बळ भरलं गेलं आणि पुढचा प्रवास एक शिक्षक, प्राध्यापक, लेखक म्हणून आज पर्यंत सुरू आहे.कौतुक सर्वांनाच होते. शिक्षक म्हणून जरी काम करत असलो तरी पुढील शिक्षण मात्र मी करत राहिलो. हे सर्व घडवण्यासाठी माझ्या घरातील संस्कार, गावातील धार्मिक कार्य, अभंग, कीर्तन, परंपरा, शाळेतील गुरुजींनी दिलेली शाबासकीची थाप, वाचनासाठी दिलेली प्रेरणा या सर्वांमुळे मी उत्तम लेखक होऊ शकलो. एक उत्तम माणूसही बनू शकलो. याची प्रचिती म्हणजे अक्षराचं मैत्र होय.

**शब्दार्थ :-** सह्याद्री - कोकण आणि देश यांच्या मध्ये दक्षिणोत्तर पसरलेला पर्वत, मैलावर - अंतर मोजण्याचे एक मापन, दळण - कांडण – दळणे व कांडणे, गोंधळ – भवानी देवीचा जागर, भाट – स्तुती करणारा, ओव्या – दळण दळताना स्त्रिया गातात ती गाणी, दिपोटी – शाळा तपासणीसाठी आलेले अधिकारी, रुतून बसणे- घट्ट बसणे, एकांकिका - एक अंकी नाटक, प्रोत्साहन देणे -उत्साह वाढवणे, प्रेरणास्थान – यशस्वी होण्यासाठी दिलेले पाठबळ, मैत्रं – मैत्री

## स्वाध्याय

### I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. लेखकाचे गाव कोठे वसले होते?
2. लेखकाच्या गावचे सोनेरी दिवस केव्हा असायचे?
3. गावात कशाचा आवाज असायचा?
4. निबंध लेखनाबद्दल कोणत्या साहेबांनी कौतुक केले?
5. श्री. म. माटे यांची कोणती कथा अभ्यासाला होती?

### II. रिकाम्या जागा भरा.

1. शेजारच्या गावात ................. चे कीर्तन होते.
2. लेखकाने............ही पहिली एकांकिका लिहिली.
3. शालेय स्तरावर लिहिलेले ............ हे हस्तलिखित होय.
4. ............. यांच्यामुळे वाचनाची आवड निर्माण झाली.

### III. जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| 1. केसरी | अ) गळफास |
| 2. आनंद | ब) मासिक |
| 3. एकांकिका | क) नागपूर |
| 4. किर्लोस्कर | ड) पुणे |

### IV. दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. लेखकाने बालपणी कोण कोणते ग्रंथ वाचले?
2. लेखकाच्या बालमनावर कोणकोणत्या प्रसंगाने संस्कार झाले?
3. गावकऱ्यांनी लेखकाचा सत्कार किती साली केला? का?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## V. संदर्भासह स्पष्ट करा.

1. 'भाताची सुगी म्हणजे आमचे सोनेरी दिवस'.

2. "आमच्या प्राथमिक शाळेच्या गुरुजींमुळेच वाचन लेखनाची सवय आणि प्रेरणा झाल्यामुळे मी उत्तम शिक्षक लेखक होऊ शकलो."

## VI. पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. लेखकाच्या गावचे निसर्ग वर्णन करा?

2. गुरुजींनी कोणत्या प्रसंगावरून लेखक, संपादक होशील असे सांगितले?

## उपक्रम :

1. विद्यार्थ्यांनो आपल्या गावचे वर्णन व अनुभव लिहा.

2. प्र.के. अत्रे यांनी लिहिलेला वाचन विषयावरील लेख मिळवून वाचा.

3. डॉ. स्नेहलता देशमुख यांचे 'अरे संस्कार संस्कार' हे पुस्तक मिळवून वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7

# आंतरराष्ट्रीय कृषितज्ज्ञ - डॉ. खानखोजे

वीणा गवाणकर



**परिचय :-** वीणा चंद्रकांत गवाणकर (जन्म - 1943) या उत्कृष्ट चरित्रकार म्हणून ओळखल्या जातात. स्वतः ग्रंथपाल असणाऱ्या गवाणकर यांनी लिहिलेली अनेक नावाजलेल्या व्यक्तिंची चरित्रे लोकप्रिय झाली आहेत. 'एक होता कार्व्हर', 'आयुष्याचा सांगाती', 'इंटिमेट डेथ', 'सर्पतज्ज्ञ : डॉ. रेमंड डिटमार्स', 'डॉ. खानखोजे - नाही चिरा नाही पणती', 'पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली' अशी त्यांची पुस्तकं गाजलेली आहेत. महाराष्ट्र शासनाने तसेच विविध संस्थांनी त्यांना पुरस्कार देऊन गौरविले आहे.

हा पाठ 'नाही चिरा नाही पणती' या पुस्तकातून संक्षिप्त करून घेतलेला आहे. या पाठामध्ये महान क्रांतिकारक व आंतरराष्ट्रीय कृषितज्ज्ञ डॉ. पांडुरंग खानखोजे यांचे व्यक्तिमत्व, देशप्रेम व त्यांच्या विचारांचे दर्शन होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य-देशप्रेम, जिज्ञासा)**

गदर क्रांतीचे प्रणेते ते मेक्सिको शेतीतले जादूगार असा प्रवास करणाऱ्या डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे ऊर्फ भाऊ यांचं सारं आयुष्यच विस्मयकारी घटनांनी भरलेले आहे.



तात्या आजोबांच्या मांडीवर बसून लहानगे भाऊ सतत स्वातंत्र्यलढया विषयीच्या कथा ऐकत असत. भाऊ हे आजोबांचे तसेच आईचेही लाडके होते. भाऊ प्राथमिक शाळेत जाऊ लागले, तसे त्यांचे मित्रमंडळही वाढू लागले. भाऊ व त्यांच्या साऱ्या मित्रांची माडीवरच्या खोलीत बंद दाराआड बसून काहीतरी खलबतं चालायची. इंग्रजांना व त्यांच्या सैन्याला कसं पळवून लावता येईल, याचे डावपेच ते आखत असत. लहानपणापासूनच इंग्रज सरकारविरुद्धचा तीव्र असंतोष भाऊंच्या मनात होता. इंग्रजांना देशाबाहेर काढल्याशिवाय देशाची परिस्थिती सुधारणार नाही, म्हणून त्याविरुद्ध लढा दयायचा, असं भाऊंनी मनोमन ठरवलं.

पुढे खेडोपाडी जिथे संधी मिळेल तिथे भाऊ स्वदेशी चळवळ, भारतीय इतिहास, भारतीय स्वातंत्र्य या विषयांवर भाषणं देत असत. स्वातंत्र्यासाठी कार्यरत असताना भाऊंनी शिक्षण योग्य प्रकारे पूर्ण करावं, लग्न करून संसार करावा, असं त्यांच्या वडिलांना वाटत होतं; परंतु भाऊंचं मन वळवण्यात वडिलांना यश आलं नाही.

स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग असणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या भेटीसाठी भाऊ पुण्याला गेले. तिथे त्यांच्या सहवासात ते राहू लागले. त्यांच्या सहवासात राहणं ही भाऊंना मोठी पर्वणीच वाटत असे. भाऊंना रणशास्त्र शिकावं असं वाटत होतं. टिळकांनीही त्याला अनुमती दर्शवली. इंग्रज सरकारच्या आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा सैन्याशी टक्कर दयायची असेल, तर परदेशी जाऊन आधुनिक लष्करी शिक्षण घ्यावं, असा टिळकांनी त्यांना सल्ला दिला. सन 1906 साली लोकमान्य टिळकांच्या सांगण्यावरून त्यांनी मायदेश सोडला.

अमेरिकेतील 'सान् राफाएल' येथील लष्करी शिक्षण देणाऱ्या ॲकॅडेमीत भाऊ दाखल झाले. शिस्तपालन, अभ्यासातील प्रगती, सर्व प्रकारच्या कामांतील तत्परता, शरीरचापल्य पाहून अकॅडेमीतील शिक्षकवर्ग भाऊंवर खूश होता. लष्करी शिक्षण घेत असताना कोणतीही उणीव राहू नये, म्हणून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. 1910 साली टमाल पेस मिलिटरी ॲकॅडमी' चा डिप्लोमा त्यांना मिळाला.

भारतीय बहुजन समाज शेतकऱ्यांचा आहे. शेती सुधारण्यावरच त्यांची खरी उन्नती व आर्थिक स्वातंत्र्य अवलंबून आहे. कृषक व श्रमजीवी एकत्र आले, तर इंग्रजांना सहज देशातून घालवून देऊ शकतील असा त्यांना विश्वास होता. शेतीच्या निमित्तानं बहुजन समाजात क्रांतीचा प्रचार करता येईल, अशा विचारानं त्यांनी कृषिशास्त्र शिक्षण पूर्ण करायचं ठरवलं. वॉशिंग्टन स्टेट कृषी महाविद्यालयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी नाव नोंदवलं. 1993 साली त्यांनी मास्टर ऑफ सायन्स (एम. एस.) ही पदवी मिळवली.



कृषिशिक्षण घेत असताना त्यांनी अमेरिकेत क्रांतिकेंद्र काढली. गदर उठावाच्या आखणीत ते आघाडीवर होते. लाला हरदयाळ, पं. काशीराम, विष्णू गणेश पिंगळे, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भूपेंद्रनाथ दत्त हे क्रांतिकारक त्यांचे सहकारी होते. सशस्त्र लढा संघटित करण्यासाठी त्यांनी जपान, अमेरिका, कॅनडा, इराण, मॉस्को, बर्लिन अशी भ्रमंती केली आणि अपार साहसे अंगावर घेतली.

कृषिशास्त्रात डॉक्टरेट प्राप्त केल्यानंतर मेक्सिको येथील सरकारी कृषी विद्यालयात त्यांची प्राध्यापकपदी नेमणूक झाली. त्यांच्या अध्यापनाचा लौकिकही वाढत होता. 'जमीन आणि पिके' या विषयात त्यांच्या शब्दाला मोल आलं. 'जेनेटिक्स' या विषयात त्यांचा दबदबा वाढला. राष्ट्रीय प्रदर्शनात मिळालेल्या प्रथम पुरस्कारामुळे

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्यांचा लौकिक अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. अध्यापनाव्यतिरिक्तच्या वेळात त्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेत आणि प्रयोगक्षेत्रात गव्हावर अभ्यास सुरू केला. त्या प्रयोगांतून त्यांनी गव्हाचे विविध वाण तयार केले. पावसाळ्यात नि उन्हाळ्यात येणाऱ्या गव्हाची संकरित जात, तांबेरा न पडणारी आणि बर्फालाही दाद न देणारी, विपुल उतारा देणारी जात, अत्यंत कमी पावसात भरपूर उतारा देणारी जात इत्यादी.

डॉ. खानखोजेंचा 'जेनेटिक्स' क्षेत्रातला अभ्यास,'जमीन आणि पिके' याबाबतीतले प्रयोग, गव्हावरचे संशोधन इत्यादी लक्षात घेऊन मेक्सिकन सरकारच्या शेतीसुधार मंडळाने त्यांना आमंत्रण दिले. संपूर्ण मेक्सिकोचा अभ्यासदौरा करावा, सर्व ठिकाणच्या कृषिसंस्था, संशोधन केंद्रे पाहावी, शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडचणी, अनुभव, विचार समजून घ्यावे, सुधारणा सुचवाव्या या कामगिरीवर डॉ. खानखोजेंची नेमणूक झाली. त्यांच्या दौऱ्याची मेक्सिकन सरकारने व्यवस्था केली. या दौऱ्यानंतर त्यांनी मेक्सिकन जनतेचे मुख्य अन्न असलेल्या मक्याची पैदासनि दर्जा वाढवण्याच्या दृष्टीने संशोधनाला सुरुवात केली. मेक्सिकोतील 'तेवो सिंतले' ही निरुपयोगी वनस्पती आणि मका यांचे संकरण करून त्यांनी 'तेवो-मका' ही मक्याची नवीन संकरित जात निर्माण केली. एकेका मक्याच्या ताटावर तीस-तीस कणसे नि ती डाळिंबाप्रमाणे संपूर्णपणे भरलेली. अमेरिकेत यशस्वी झालेले मक्यासंदर्भातील प्रयोग त्यांनी मेक्सिकोत राबवले, त्यामुळे मेक्सिकोत मक्याची लागवड आणि पैदास उत्तमरीत्या वाढली. मेक्सिकन सरकारने 1930 सालचा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरणारा आणि संशोधनासाठी असणारा पुरस्कार देऊन डॉ. खानखोजेंचा गौरव केला.

गहू, मक्यानंतर त्यांनी तूर, चवळी यांचे विविध वाण तयार केले. सोयाबीनची लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यांनी शेवग्यावरही संशोधन केले. शेवग्याचा पाला, मुळ्या, शेंगांतील बिया आणि त्या बियांपासून मिळणारे सुगंधी तेल यांचे महत्त्व विशद करणारी पुस्तिका प्रकाशित करून सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली.

अपार देशप्रेम असणारा एक क्रांतिकारक, शेतकऱ्यांविषयीची कळकळ असणारा एक कृषितज्ज्ञ म्हणजे डॉ. पांडुरंग खानखोजे होय.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :**

वाण- जेव्हा दोन शुद्ध प्रजाती प्रथमच संकरित होतात तो एक वाण असतो, पैदास – उत्पादन, संकरित – मिश्र, हायब्रीड पर्वणी – दुर्मिळ संधी, डावपेच – युक्ती, विस्मयकारी – आश्चर्यचकित, डिप्लोमा – पदविका, श्रमजीवी – कामगार, श्रमिक, उन्नती – विकास, कृषक – शेतकरी, अकॅडमी – विशेष प्रशिक्षण देणारी संस्था, टक्कर देणे – लढा देणे, संघर्ष करणे. जेनेटिक्स – अनुवांशिक, ताट – कडब्याचे ताट, भ्रमंती करणे – प्रवास करणे, दर्जा वाढविणे – गुणवत्ता वाढविणे, लौकिक वाढणे – कीर्ती पसरणे, पराकाष्ठा करणे – प्रयत्नांची शर्थ करणे.

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) भाऊंनी मास्टर ऑफ सायन्स ही पदवी कोठे प्राप्त केली ?

अ) जपान ब) वॉशिंग्टन क) मेक्सिको ड) इंग्लंड

2) कोणत्या विषयात भाऊंचा दबदबा वाढला ?

अ) फिजिक्स ब) मॅथेमॅटिक्स क) जेनेटिक्स ड) इकॉनॉमिक्स

3) भाऊंनी कोणत्या विषयात डॉक्टरेट पदवी मिळवली ?

अ) रसायनशास्त्र ब) प्राणीशास्त्र क) भौतिकशास्त्र ड) कृषीशास्त्र

4) 'आंतरराष्ट्रीय कृषितज्ज्ञ' या पाठात कोणाचा जीवन प्रकाश उलगडला आहे ?

अ) डॉ. पांडुरंग खानखोजे ब) डॉ. वीणा गवाणकर क) लोकमान्य टिळक ड) महात्मा गांधी

5) भाऊंनी संशोधन केलेल्या मक्याच्या ताटाला किती कणसे लागत असत ?

अ) चार ब) तीस क) वीस ड) दहा

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

### II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) टमाल पेस मिलिटरी ॲकॅडमीचा डिप्लोमा भाऊंनी केव्हा पूर्ण केला ?

2) गदर उठावाच्या आखणीत डॉ. खानखोजे यांचे सहकारी कोणकोण होते ?

3) मेक्सिकन शेतीतील जादूगार असे कोणाला म्हटले जाते ?

4) मेक्सिकन जनतेचे मुख्य अन्न कोणते ?

5) लोकमान्य टिळकांना भेटण्यासाठी भाऊ कोठे गेले होते ?

### III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) डॉ. खानखोजे यांनी गव्हाचे कोणकोणते वाण तयार केले ?

2) 'तेवो-मका' ही जात डॉ. खानखोजे यांनी कशी निर्माण केली ?

3) डॉ. खानखोजे खेडोपाडी जाऊन कोणकोणत्या विषयावर भाषण देत असत ?

4) मेक्सिकोत मक्याची लागवड आणि पैदास कशी वाढली ते लिहा ?

5) डॉ. खानखोजे यांनी सशस्त्र लढा संघटित करण्यासाठी कोणकोणत्या देशात भ्रमंती केली ?

## IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1) डॉ. पांडुरंग खानखोजे यांनी कोणकोणत्या पिकांचे वाण तयार केले त्याबद्दल थोडक्यात माहिती लिहा ?

2) कोणत्या कार्यासाठी मेक्सिको सरकारने डॉ. पांडुरंग खानखोजे यांची नेमणूक केली ?

## V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

1) इंग्रज सरकारच्या आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा सैन्याशी टक्कर द्यायची असेल, तर परदेशी जाऊन आधुनिक लष्करी शिक्षण घ्यावं.

## भाषाभ्यास

### अ) समानार्थी शब्द लिहा.

1) आई -

2) मित्र -

3) अनुमती -

4) उणीव -

### ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) स्वदेशी ×

2) स्वातंत्र्य ×

3) यश ×

4) सक्रिय ×

5) आधुनिक ×

6) मायदेश ×

7) प्रगती ×

8) विश्वास ×

9) लौकिक ×

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

### ड) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) डावपेच आखणे

2) नेमणूक करणे

3) पराकाष्ठा करणे

4) भ्रमंती करणे

5) दर्जा वाढविणे

6) लौकिक वाढणे

7) दाद न देणे

8) दबदबा वाढणे

9) टक्कर देणे

### उपक्रम:

1) भारतीय शास्त्रज्ञांचे शोध व कार्य यांची यादी करा.

2) तुमच्या घराजवळ असलेल्या रोपवाटिकेला भेट देऊन माहिती लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

8

# सागरकन्या - रुपाली रेपाळे

सुमेध वडावाला

Q5B3T6



**परिचय :-** मृत्युंजय श्रीकृष्ण रिसबूड (जन्म -1962) कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील खेड हे त्यांचे मूळ गाव. सुमेध वडावाला या नावाने त्यांनी साहित्य लेखन केले आहे. ‘बावनकशी भाग्य आलं’,‘दोन चाके झपाटलेली’ हे कथासंग्रह. ‘धर्मयुद्ध’ ही कादंबरी अशी त्यांची साहित्य संपदा प्रसिद्ध आहे.

इच्छा असेल तर मार्ग सापडतोच. फक्त प्रयत्न करणे आवश्यक आहे. एका मराठमोळ्या तरुणीच्या जिद्दीची ही कहाणी. वयाच्या 12 व्या वर्षी ऑगस्ट 1994 साली इंग्लिश खाडी तिने पोहून पार केली. त्यावर्षी ती लंडन टाईम्सच्या पहिल्या पानावर झळकली. तेराव्या वर्षी तिला भारताच्या राष्ट्रपतींकडून युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोळाव्या वर्षी तिला न्यूझीलंड सरकारने 'डॉल्फिन क्वीन' ही उपाधी देऊन सन्मानित केले. ह्या डॉल्फिन क्वीनचे नाव आहे रुपाली रेपाळे, भारताची ओपन स्विमर. तिने कुक स्ट्रेट ही खाडी 1998 साली पोहून पार केली आहे.हा पाठ 'जल आक्रमिले' या चरित्रातून संपादित करून घेतलेला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य - धाडस, जिद्द)**

'कूक स्ट्रेट' एवढं थकवेल अशी मुळीच कल्पना नव्हती मला! ती कठीण खाडी आहे हे मला माहीत होतं. 'इंग्लिश चॅनेल' च्या खालोखाल अथवा तेवढीच ती कठीण मानली जाते, तिथं गेल्यावर 'असोसिएशन' नं मला 'यू मस्ट नो अबौट अवर कूक स्ट्रेट' अशा काहीशा नावाचं त्यांचं माहितीपत्रक दिल होतं. आम्ही तिथं गेलो ते 1998 साल होतं आणि आम्ही गेल्या दिवसापर्यंत तब्बल बाराशे माणसांनी ती खाडी पार करायचा आजवर प्रयत्न केला होता, असं त्यात लिहिलेलं होतं. 'खाडीच्या ज्ञात' इतिहासात म्हणजे शेकडो वर्षांत ज्या बाराशे माणसांनी प्रयत्न केला होता, त्यांपैकी फक्त छत्तीस माणसांनी ती पार केली होती. या छत्तिसांपैकी अगदी क्वचित अशा दोघा तिघांनीच ती पहिल्या प्रयत्नात पार केली होती. उरलेल्या सर्वांना किमान दोन वेळा प्रयत्न करावे लागले होते. भारताच्या तारानाथ शेणॉयनं ती खाडी पार करून, खाडी पार करणारा पहिला भारतीय म्हणून मान पटकावला होता. पण त्यालाही एकदा अयशस्वी माघार घ्यावी लागली होती. हे सारं वाचल्यावर, नॉर्थ आणि साऊथ आयलंडना जोडणाऱ्या 'कूक स्ट्रेट' चा प्रवास सोपा नाही तो कठीण आहे याची मला पुरेशी कल्पना होती.

तरीही एकूण सात-आठ तासांच्या दमवणुकीनंतर हा समुद्र आपल्याला प्रसन्न होईल आणि त्याच्या दुसऱ्या किनाऱ्यावर आपल्याला सुपूर्द करेल, अशी माझी समजूत होती. ती या खाडीनं धुळीला मिळवली. 'धुळीला मिळवली' असा शब्दप्रयोग करता येणार नाही. तसा करण्याइतकाही धुळीचा, मातीचा, वाळूचा अंश या समुद्रानं मला दाखवला नाही. सारं दर्शन ज्याचं होतं आणि त्यायोगे हुलकावण्या देत राहिला तो अजस्र क्रूर खडकांचा प्रदेश! 'रॉकी' आयलंड्स दरम्यानचं 'रॉकी चॅनेल' ही तिची ख्याती मी वाचली असली तरी तो प्रकार खाडी पार करण्याच्या आपल्या योजनेला शह देण्याइतका नाठाळ असेल, अशी मला कल्पना नव्हती. 'हवामाना' बद्दल मी कोणत्याही भ्रमात नव्हते. हवामानाचे सारे अंदाज लक्षात घेऊनच खाडी प्रवासाला सुरुवात केली जात असली, तरी पाण्यात पाऊल ठेवल्यानंतरच्या कोणत्याही क्षणापासून ते शत्रुत्व पत्करतं पत्करतंच, आपल्या लहरीपणाचा फटका देत राहतं, दमछाक  करत राहत, हे मी गृहीत धरलेलं होतं.

एवढ्या खाड्या पार केल्यावर ते माझ्या अंगवळणीच पडलं होतं. तरीही इथला  वारा काही अजबच म्हणायला हवा! या समुद्रातल्या बोटी वाऱ्यामुळे उलथल्या  जाऊन समुद्रातल्या दगडांवर आदळल्या होत्या, असा इथला वारा आणि समुद्रशिळा अजस्र आहेत असं 'कुक'च्या त्या माहितीपत्रकामुळे मला माहीत असलं, तरी त्या वाऱ्याचा परिणाम हा असा राक्षसी असेल याची मला कल्पना नव्हती. शरीराचा जो भाग पाण्याखाली असायचा त्याला पाण्याचा थंडा जाच आणि लाटांचे तडाखे सहन करायला लागावेत हे स्वाभाविक होतं. पण पाण्याबाहेर असणाऱ्या, फटके मारत राहणाऱ्या माझ्या थकल्याभागल्या हातांना तो झोंबरा वारा जणू काहीकातडी सोलून काढण्याचा प्रयत्न करत असल्याप्रमाणे सदैव ओरबडत होता. असा थकवा, गळून जाणं मी यापूर्वीपर्यंत जणू अनुभवलंही नव्हतं.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



कित्येक तास झाले असतील. कित्येक 'फीडिंग्ज' झाली असतील-नसतील, मी अशी वैतागून गेले होते, की 'फीडिंग्ज' किती वेळा झाली आहेत हे मोजणंही मी सोडून दिलं. सात-आठ तासांचा आपला अंदाज केव्हाच खोटा ठरला आहे, हे माझ्या कधीच लक्षात आलं. मी आपली निर्जीवपणे पोहत राहिले. कधी कधी

पाणी जणू संपुष्टात यायचं एवढा खडकाळ प्रदेश पसरलेला असायचा. एवढा समुदाय खडकांचा, की 'समुद्र खडकांचा बनलेला असतो,' असं कुणी सांगितलं तर लगेच खरं वाटावं.

इथला किनाराही असा फसवा आणि संतापजनक होता की आपण किनाऱ्याला लागलो आहोत याचा खोटा आणि काही क्षणांपुरता आनंद देऊन तो क्रूर थट्टा करायचा, पुन्हा नामानिराळा व्हायचा आणि 'अजून तुझ्या नशिबी पोहणं आहे गं!' असं म्हणत लाटा निर्घृणपणे माझ्यावर आदळत राहायच्या. पाणी संपून किनारा सुरू झाला असल्याच्या साऱ्या खुणा दिसायच्या मला. पाण्याची खोली पोहण्यासाठी पुरेशी नाही असा उथळपणा जाणवून खुषी पसरायची मनावर, पण पाण्याला बंदिस्त करणारे दगड- अजस्र शिळा हातात हात घालून उभ्या असल्याप्रमाणे अशा दूरवर पसरलेल्या असायच्या, की पोहण्याचे विक्रम हे रॉक क्लायम्बिंगचे विक्रमही ठरले जावेत.

असं केवळ पोहणं आणि पोहणं! केव्हातरी ते संपून गेलं! मात्र ते संपण्यापूर्वी आपण किनाऱ्यावर आलो आहोत एवढं माझ्या लक्षात आलं. पुढं कुणी मला उचललं, काय केलं हे मला कळलं वा कळलं नाहीही! ओल्या अंगाभोवती लपेटलं जाणारं गरम काही मला हवंहवंस वाटत होतं आणि त्याचा स्पर्श विलक्षण नकोनकोसाही वाटत होता. शरीर एवढं दुखत, ठणकत होतं. कुणीतरी माझी कॅप उतरवली. पण डोक्यावरचे माझे केसही मुळापासून दुखत होते. बरंच काही त्यांत अडकलं असावं. कुणीतरी कंगव्यानं ते काढू पाहत होतं आणि आत्यंतिक वेदनांनी मी ओरडत होते. म्हणजे मला ओरडायचं होतं. पण घसा एवढा सुजला होता, दुखत होता की मला आवाजही काढता आला नाही. असा सारा शक्तिपात देहभर, मनभर पसरलेला असताना कुणीतरी म्हणालं, "शी इज दि फर्स्ट इंडियन फीमेल टु क्रॉस दि 'कूक स्ट्रेट' " आणि नंतरचं मला काहीही कळलं नाही. बेशुद्ध पडण्याचा क्षणही मी शुद्धीत अनुभवला आहे. तिचे हे साहस पाहून न्यूझीलंडचे क्रीडामंत्री मॅकमिलन यांनी तिला 'डॉल्फिन क्वीन' असा उत्स्फूर्तपणे किताब दिला.

**शब्दार्थ :-** खाडी - नदीत जेथवर समुद्राच्या भरतीचे पाणी येते तो भाग. अजस्र - फार मोठा. नाठाळ - खोडसाळ, खट्याळ. दमछाक - दमणूक. झोंबरा - तीव्र वेदना करणे. निघृण - निष्ठूर. सुपूर्द करणे - सोपविणे. धुळीला मिळणे - नाहीसे होणे. हुलकावणी देणे - फसविणे. शह देणे - मात देणे. गृहीत धरणे - मनात ठरविणे. शत्रुत्व पत्करणे - वैर घेणे. दमछाक होणे - दमणूक होणे. शक्तिपात होणे - शक्तीची हानी होणे.

**टीप :-** कूक स्ट्रेट ही खाडी न्यूझीलंडच्या उत्तर आणि दक्षिण बेटांना जोडते.हे अंतर 22 कि. मी. (14 मैल) असून कूक स्ट्रेट 250 मीटर खोल आहे. सामुद्रधुनीचे नाव जेम्स कुक या पहिल्या युरोपियन कमांडरच्या नावावरुन 1770 मध्ये ठेवण्यात आले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून उत्तर लिहा.

1) 'कुक स्ट्रेट' खाडी ही कोणत्या देशाजवळ आहे ?

अ) जपान ब) न्यूझीलंड. क) चीन ड) अमेरिका

2) 'कुक स्ट्रेट' खाडी पार करणारा पहिला भारतीय पुरुष कोण ?

अ) आदिनाथ. ब) श्रीनाथ चौधरी क) तारानाथ शेणॉय ड) विक्रांत दिघे

3) रुपाली 'कुक स्ट्रेट' खाडी कोणत्या साली पार केली ?

अ) 1994 ब) 1992 क) 1996 ड) 1998

4) न्यूझीलंड सरकारने रूपाली रेपाळेला कोणता किताब दिला आहे ?

अ) डॉल्फिन क्वीन ब) सागर कन्या क) जलकन्या ड) सी क्वीन

5) रूपाली रेपाळेचे कौतुक कोणी केले आहे ?

अ) राष्ट्रपती थॉमसन ब) क्रीडामंत्री मॅकमिलन क) पंतप्रधान रॉबर्ट ड) मंत्री कार्लसन

### II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) न्यूझीलंड असोसिएशनने रूपालीला कोणते माहितीपत्रक दिले ?

2) 1998 सालापर्यंत किती लोकांनी खाडी पार करण्याचा प्रयत्न केला होता ?

3) 'कुक स्ट्रेट' ही खाडी किती लोकांनी यशस्वीपणे पार केली होती?

4) 'धुळीला मिळवली ' असा शब्दप्रयोग करता येणार नाही असे रूपाली का म्हणाली ?

5) न्यूझीलंडच्या क्रीडा मंत्र्यांनी कोणत्या शब्दात रूपालीचे कौतुक केले ?

### III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) 'कूक स्ट्रेट 'बद्दल रूपालीच्या मनात कोणती कल्पना होती ?

2) पोहण्याचे विक्रम हे रॉक क्लाइंबिंगचे विक्रम ही ठरतील असे रूपालीने का म्हटले आहे ?

3) खाडीच्या इतिहासातून आपल्याला कोणती माहिती मिळाली ?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## IV. खालील प्रश्नांचे उत्तर चार- पाच वाक्यात उत्तर लिहा.

1) 'कूक स्ट्रेट 'खाडी पोहून आल्यावर रूपालीची अवस्था कशी होती हे स्पष्ट करा .

## V. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

1) 'नॉर्मल आणि साऊथ आयलंड जोडणाऱ्या 'कूक स्ट्रेटचा ' प्रवास सोपा नाही.'

2) 'अजून तुझ्या नशिबी पोहोणंच आहे गं'

3) 'शी इज दि फर्स्ट इंडियन फिमेल हु क्रॉस दि 'कुक स्ट्रेट'.

## भाषाभ्यास

### अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1) समुद्र 2) शत्रू 3) दगड 4) प्रवास 5) वेदना 6) समता

### ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) यशस्वी 2) क्वचित 3) सोपे 4) निर्जीव 5) बेशुद्ध 6) समज

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) सुपूर्द करणे
2) धुळीला मिळणे
3) हुलकावणी देणे
4) शह देणे
5) गृहीत धरणे
6) शत्रुत्व पत्करणे
7) दमछाक होणे
8) शक्तिपात होणे

- **शब्दज्ञान**

**खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे सोडविण्याचा प्रयत्न करा.**

उदा :-




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :-** पोहण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकाकडून पोहण्याची कला व त्यातील बारकावे जाणून घ्या. तुमच्या परिसरातील जलतरणपटूची माहिती मिळवून छायाचित्रासह माहिती लिहून काढा.

9

# फुलण्यात मौज आहे

प्रवीण दवणे

M5D8H9



**परिचय :-** प्रा. प्रवीण दवणे (जन्म – 1959) हे मराठी लेखक, गीतकार, पटकथालेखक आहेत. ते ज्ञानसाधना महाविद्यालयात प्राध्यापक होते. ते उत्तम वक्ते आहेत. 'दिलखुलास', 'सावर रे!' 'वय वादळ विजांचं', 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा' हे त्यांचे कार्यक्रम विशेष गाजले असून त्यांना महाराष्ट्र राज्याचा सर्वोत्कृष्ट वाङ् मय पुरस्कार, ठाणे ग्रंथालयाचा रेगे पुरस्कार, मा. दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानचा शांता शेळके, सरस्वती पुरस्कार इत्यादी पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांची 'दिलखुलास', सावर रे!', 'थेंबातले आभाळ' रे, 'जीवना', 'जाणिवांच्या ज्योती', आनंदोत्सव, 'देहधून', 'द्विदाल ', 'स्वप्न बघा, स्वप्न जगा' ही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

हा पाठ त्यांच्या फुलण्यात मौज आहे या पुस्तकातून घेतला आहे. किशोरावस्था म्हणजे आयुष्याचं सर्वात कोवळ वळण ! निरागस रोपासारखं याच वयात सकारात्मक संस्कारांचं खतपाणी मिळालं तरच ते रोप फुलतं, देठादेठात बहरून येतं. स्पर्धात्मक युगामध्ये मनाला घुसमटून जगण्यापेक्षा जीवनाचा आनंद घ्यायचा व विकसित व्हायचं असा संदेश या पाठात दिला आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## (मूल्य - उत्सुकता, कुतूहल)

एक बी रुसली. जगावर, आकाशावर, सूर्य- - चंद्रावर साऱ्यासाऱ्यांवर रुसली. प्रत्येक जण येऊन तिला विनवत होतं, पण ती आपली पाठ फिरवून बसली. आकाश म्हणालं, "अगं, अशी रुसलीस का ? सांग तर खरं काय बिनसलं तुझं ?”

बी म्हणाली, "माझ्या आयुष्यात काही गंमत नाही. मी धड जिवंत नाही की मेलेलीही नाही. काय होतंय मला कळतच नाही. सगळे कसे मजेत आहेत. वारा खदाखदा हसत फिरतोय. नदी खळाखळा धावत सुटलीय. ही फुलपाखरं नुसती दंगा करत आहेत. इथून तिथं, तिथून इथं..सगळे मला चिडवत आहेत !

"अगं तुला कशाला चिडवतील ?" आकाश मायेनं म्हणालं"नाहीतर काय ? मला ना रंग ना रूप, ना सूर ना ताल, कुणी ढुंकून बघत नाही माझ्याकडं. मी ही अशी आकार असून निराकार, म्हणूनच सगळे मला चिडवताहेत. हे, सगळे म्हणजे त्यात तूही आलास!" मी ? आकाश जरासं दुखावलं. आपण इतक्या मायेनं बीला विचारतोय. खरंच बीनं असं रुसून उपयोग नाही, म्हणून किती किती प्रयत्न करतोय, आणि बी आपल्यालाही

म्हणतेय मी तिला चिडवतोय म्हणून... " मनातल्या मनात आकाश हिरमुसलं. पण तेवढयात खेळायला ताज्या रविकिरणाचा एक बाळसेदार मित्र आला न् ते उजळलंही.

बी पुन्हा आहे तिथंच पडून राहिली. घुश्शात. जगावर डोळे वटारून. फुलपाखरालाही तिची दया आली. त्याला अजून बऱ्याच फुलांवर खेळायचं होतं, पण तरीही वेळात वेळ काढून फुलपाखरू बीकडे गेलं " अगं, अशी कोपऱ्यात काय बसली  आहेस, तेही खडकाच्या कपारीत. एवढा प्रकाश बाहेर आहे, आणि तू अशी हट्टी मुलीसारखी काळोखात काय लपली आहेस. ये ना बाहेर. बघ आता आभाळ भरून येईल. ये ना !"

एवढुशी रुसलेली बी पण तिचा तोरा जबरदस्त होता. तोऱ्यानं ती वस्सकन खेकसून म्हणाली, "नको अक्कल शिकवूस मला. आलायस मोठा शहाणा. स्वतःला रंगीत रंगीत पंख आहेत, म्हणून तुझी मिजास.  ते मला दाखवून, तुला मला चिडवण्याचा आनंद घ्यायचाय हे मला माहीत आहे, जा निमूट आपल्या वाटेनं, माझ्या भानगडीत पडू नकोस "फुलपाखरू दुखावलं.

"आपण गेलो कशासाठी, न् ऐकावं काय लागलं-" या हुरहुरीनं खंतावलं. तेवढ्यात एका पिवळया फुलानं साद घातली, 'ए मित्रा, तुझ्यासाठी केव्हाचा मध साठवून ठेवलाय - ये ना-! "

फुलपाखरू तरतरीत झालं- पुन्हा पंख पसरून उडून गेलं. पिवळ्या फुलाशी मधभरल्या गप्पा मारू लागलं.

पुन्हा "हुं" असं फणकारत बी आहे तिथंच रुसून बसली. जवळच्या झऱ्याला खरं तर बीजवळ यायचं होतं. त्यानंही चारपाच वेळा साद घालायचा प्रयत्न केला,

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



"अगं, मला येववत नाही गं तिकडं. पाऊस पडेल तेव्हा पुन्हा माझ्या पावलात ताकद येईल, पण तू ये ना. वाऱ्याच्या पंखावर बसून, ये इथं काठावर जरा गप्पा मारू. तू एकटी - मी एकटा.

बी दुरूनच ओरडली, " चार चार वेळा हेच सांगून दमत कसा नाहीस रे ? ऐकून ऐकून माझे कान किटले. पण तू काही विटत नाहीस. काय झालंय तुला. बघ केवढा अशक्त झाला आहेस. स्वतःची प्रकृती सुधार आधी, मोठा मला बोलवतोय. मला पडू दे अशीच, मी एकटी बरी आहे! आधीच पावसाची वाट पहात राहिलेला झरा दुखावला.... दुरावला... मनात पुटपुटला, "काय म्हणावं या कर्माला ? आपण इतकं चांगल्यासाठी सांगतोय, पण म्हणतात ना ज्याचं करावं भलं.. तो म्हणतो माझंच खरं !"

वारे बदलले.. सावळे होत थरथरून वाहू लागले. आभाळ सावळयासावळया ढगांनी भरून आलं. झाडा-माडांनासुद्धा पाऊस येणार या आनंदानं सुखाचं कापरं भरलं. सगळे सगळे कसे मजेत होते. फुलपाखरं आडोशाला लपली. नव्या अंकुरांची, त्यातून उमलणाऱ्या नव्या फुलांची स्वप्नं पाहू लागली. सगळे कसे आनंदात होते. पाखरं तर घरट्यात दंगा करीत होती. पंख फडफडवीत पावसाला "ये.. ये.." म्हणत होती.

देवाची पावलं सृष्टीवरून चालली होती. सारं सारं जग सुखी करण्याच्या प्रयत्नात देवाला अचानक ती कोपऱ्यात पडलेली बी दिसली. उदास, एकुटवाणी. अरे, सगळं जग इतकं आनंदात आणि आपण असताना ही बी का बरं अशी ?

देव सहज तिच्याकडे वळला.

पण बी कसली ?

देवाकडेही पाठ फिरवून बसली.

देवाला गंमतच वाटली.

देवाचा अनुभव वेगळाच होता. सगळं जग देवाला प्रार्थना करतं - 'प्रसन्न हो' आणि ही कोण बुवा धिटुकली ?

देव म्हणाला, “ अहो, बीताई, इकडे बघा ! " 'हं, आम्ही नाही जा !”

"अगं, रुसायला काय झालं, ते तर सांगशील की नाही ?" "सगळया जगाला तू सुंदर केलं आहेस. सगळं प्रेम त्यांच्यावर, मला मात्र हे असं काळंकरडं कुरूप केलं आहेस.

सर्व बाजूंनी फक्त अन्यायच झालाय माझ्यावर. फक्त अन्याय. बाहेर येऊन काय करू ? या आनंदी जगाचा आनंद पाहून मी आणखीनच दुःखी होते आहे. त्यापेक्षा इथं पडून राहिलेय ती बरी आहे. तू जा. त्या पाखरांना गाणी दे, झऱ्याला पाणी दे - मला राहू दे इथंच.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

देवाला कारण कळलं.

देव गडगडून हसू लागला.

बी दचकली.

हे गडगडणं वेगळंच होतं.

देवाला कळलं, "हिनं साऱ्या जगाला नाकारलं, म्हणून ही अशी. उन, वारा, पाऊस सारं झेललं असतं, मोकळया मनानं साऱ्या साऱ्या जगाशी हितगुज केलं असतं, तर ही अशी नसती. बाकीची रोपं, पानं, फुलं, वेली, डोंगर झरे - निसर्गाचं स्वागत करीत होते. ह्या वेडाबाईनं मात्र सारा उत्सव नाकारला. हिला जगण्यातली मौज कळलीच नाही, म्हणून ही अशी." देव अजून गडगडून हसला.

बी दचकली.

देव हसता हसता पाऊस पाडू लागला. बघता बघता पाऊस मुसळधार झाला. वारा आणखीनच फोफावला. आपल्या आग्रही हातानं त्यानं रुसलेल्या बीला बाहेर आणलं. वरून पावसाची धार बरसली. मातीनं नाजूक शाल पांघरली.

सात आठ दिवस गेले.

मनात नसतानाच बीला हिरवी जांभई आली.

तिनं आळस देत दोन्ही हात वर ताणले.

आकाश हसलं...

वारा खुलला. बीला मजा वाटली. झोक्यात झुलताना, आणखी काही दिवस गेले. तिच्या गळयातून एक गाणं उमललं. गुलाबी जांभळया रंगाचं.

पाकळी पाकळी फुलली...

पिवळं फुलपाखरू गुणगुणत आलं. बीचं रुसणं पळून गेलं...

देठावर एक गोजीरवाणं फुल फुलून आलं.

सगळं जग खुललं तेव्हा बीचं रुसणं संपलं.

बी म्हणाली, “ अरे, हे जग स्वच्छच आहे - त्याहून सुंदर आहे !

फुलपाखरू म्हणालं, “जगण्यात मौज आहे की नाही ! कळी म्हणाली, "जगण्यात तर मौज आहेच, पण फुलण्यात खरी मौज आहे!"

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**शब्दार्थ :-** बिनसणे - बिघडणे, हिरमुसणे - उत्साहहीन होणे, निराकार - आकारहीन, घुश्शात - रागात, बाळसेदार - गुटगुटीत, कपारीत - खडकांच्या खाचेत, खेकसणे - चिडणे, साद घालणे - हाक मारणे, फणकारणे - संतापणे, कान किटणे - तीच तीच गोष्ट ऐकून कंटाळणे, हितगुज - कानगोष्ट, फोफावणे - जोमाने वाढणे.

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून उत्तर लिहा.

1) साऱ्या जगावर कोण रुसून बसलं आहे ?

अ) वारा ब) आकाश क) बी ड) फुलपाखरू

2) फुलपाखराला कोणी साद घातली ?

अ) लाल फुलाने ब) पिवळ्या फुलाने क) गुलाबी फुलाने ड) लाल फुलाने

3) अशक्त कोण झाले आहे ?

अ) रोप ब) फूल क) वारा ड) झरा

4) घरट्यात दंगा कोण करीत आहे ?

अ) पाखरं ब) पोपट क) कावळे ड) चिमण्या

5) फुलण्यात खरी मौज आहे असे कोणी म्हटले आहे ?

अ) फुलपाखराने ब) बीने क) वाऱ्याने ड) झऱ्याने

### II. एका वाक्यात उत्तरे लिहा .

1) बी कोणावर रुसली आहे ?

2) बी कोठे रुसून बसली आहे ?

3) सुखाची कापरं कोणाला भरले आहे ?

4) पावसाला ये ये असे कोण म्हणत आहे ?

5) निसर्गाचे स्वागत कोण करीत आहे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन - तीन वाक्यात लिहा.

1) बी च्या रुसण्याचे कारण काय होते ?

2) पावसाची चाहूल लागताच वातावरणात झालेला बदल कसा होता ?

3) बी च्या एकटेपणा बद्दल देवाने काय सांगितले आहे ?

## IV. खालील प्रश्नांची उत्तरे चार - पाच वाक्यात लिहा.

1) फुलण्यात मौज आहे ! हे कोणत्या बदलामुळे बी ला समजले. हे स्पष्ट करा.

## V. खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली आहेत ते लिहा.

1) 'अगं अशी कोपऱ्यात काय बसली आहेस.'

2) 'चार चार वेळा हेच सांगून दमत कसा नाहीस रे ?'

3) 'अरे हे जग स्वच्छच आहे त्याहून सुंदर आहे.?'

## भाषाभ्यास

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1) सूर्य

2) चंद्र

3) आकाश

4) वारा

5) आयुष्य

### ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) काळोख

2) अन्याय

3) आनंद

4) स्वच्छ

5) प्रकाश

6) सुख

7) कुरूप

**क) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) भानगडीत पडणे

2) साद घालणे

3) कापरं भरणे.

4) हितगुज करणे

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

ड)	या पाठात 'आकाश मायेने म्हणालं', 'फुलपाखरू फुलाशी गप्पा मारू लागलं', 'झरा म्हणाला, ये इथं काठावर जरा बस'. अशी वाक्यरचना आलेली आहे त्यातून निसर्गातील निर्जीव घटक बोलत आहेत असे दर्शवले आहे. याप्रमाणे खालील चित्रे पाहून तुम्ही दोन ओळींचा संवाद तयार करा.






@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

वरील पाठात 'ज्याचे करावे भलं तो म्हणतो माझंच खरं ' अशी एक मराठीतील प्रचलित म्हण आलेली आहे, त्याप्रमाणे तुम्ही विविध म्हणी शोधून त्या लिहून काढा.

**उपक्रम :-**

1. दुःखी किंवा नाराज असलेल्या तुमच्या जवळील व्यक्तीला तुम्ही कसे हसवाल यासाठी तुमचे विचार दहा ओळीत लिहा.
2. निसर्गातील तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टींची चित्रे चिकटवून माहिती लिहा.

# 10 ते जीवनदायी झाड

भारत सासणे

B3T3V1



**परिचय :-** भारत जगन्नाथ सासणे (जन्म: 1951) प्रसिद्ध लेखक, कथाकार, नाटककार, कादंबरीकार. 'अनर्थ', 'लाल फुलांचे झाड', 'रात्र', 'चिरदाह' हे कथासंग्रह 'सर्प', 'दूर तेथे दूर तेव्हा' या लघुकादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.सन 2022 मध्ये उदगीर (महाराष्ट्र) येथे झालेल्या पंचाणण्व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. पुरस्कार - सूर्योदय पुरस्कार,विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार.

फलदायी व जीवनदायी लिंबाचे झाड आणि मानवी जीवन यांची सुंदर सांगड घालण्याचा यशस्वी प्रयत्न प्रस्तुत पाठात लेखकाने केला आहे. या पाठाचा साहित्य प्रकार पर्यावरणीय लेख आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य – वृक्षप्रेम)**

मी राहत होतो त्या घराच्या मागं एक लिंबाचं झाड होतं. लिंब म्हणजे कडूलिंब नव्हे. आपण खातो त्या लिंबाचं झाड. खिडकीलगतच होतं ते काटेरी आणि लिंबाच्या फळांनी गच्च लगडलेलं असं. लसलशीत हिरवंगार आणि चैतन्यमय. प्रदेश सगळा उन्हाचा होता. त्या भागात एकूणच उन्हाळा जास्त, आसमंत तापून जाई. आसपासची जमीन तापून करपून तपकिरी पडलेली दिसे. जी काही झाडं आसपास होती ती मलूल आणि काळपट हिरवी दिसत आणि पाणथळ तर परिसरात कुठंच नव्हती. सगळीकडं शुष्क कोरडी जमीन. घरसुद्धा तापून निघे. या सगळ्या पार्श्वभूमीवर ते झाड म्हणजे विलक्षण जीवनमय आणि जीवनदायी वाटे.



खरं तर भिंतीच्या उंचीचे झालेलं लिंबाचे झाड म्हणजे भोवतालच्या सजीवांच्या दिलाशाचं केंद्र झालं होतं, हे माझ्या लक्षात आलं. त्या झाडाखाली 'काळीभोर सावली' असे. मोरीचं पाणी सगळं त्या झाडाला जाई. त्यामुळं जमिनीत नेमकी तिथंच ओल असे. त्या ओलसर जमिनीत मला काही शंख दिसू लागले. आज इथं दिसलेला शंख उदया तिथं दिसे. रात्रीतून तो बराच सरकलेला असे. लहान-मोठे अनेक शंख मग दिसून येऊ लागले. मग लक्षात आलं, की या झाडाखाली गोगलगाईची वस्ती आहे. इतक्या मोठया आकाराच्या गोगलगाईची वस्ती मी प्रथमच पाहत होतो आणि प्रथमच मी असंही पाहिलं, की त्या गोगलगाई शंख पाठीवर घेऊन तर चालतातच; परंतु त्या झाडांवरही चढतात. फांदीवर

चिकट रंगानं बरबटलेल्या गोगलगाई पाहणं, त्यांचा प्रवास निरखणं हा माझा आणि लहान मुलांचा कौतुकाचा कार्यक्रम होऊन बसला होता.

लवकरच एक पारव्याची जोडी त्या गर्द हिरव्या आश्चर्यात दिलासा शोधू लागली. त्या जोडीनं काड्याकाड्यांचं एक घरटं त्या लिंबाच्या काटेरी झाडात बांधायला सुरुवात केली. खिडकीतून किंवा दारातून हळूच पाहिलं, की गुंजांच्या डोळ्यांची, लुकलुकत्या नजरेची पारवी दृष्टीस पडे. भोवतालच्या रखरखीतून त्या जोडीनं एक थंड असा आश्रय शोधून काढला होता. माझा मुलगा तिथं वारंवार जाऊन पाही म्हणून मग ते जोडपं हळूहळू दिसेनासं झालं.

चिमण्या आणि इतर पक्षी यांनी ते झाड नेहमी गजबजलेलं असे. जणू गातं बहरतं संगीतमय झाड! तुरेदार बुलबुल आणि पोपट नेहमी तिथं दिसत. त्या सगळ्यांचं ते झाड म्हणजे एक केंद्र, एक आकर्षण, एक आश्वासनाचं, विश्वासाचं ठिकाण झालं होतं.

कलकलाट आणि गजबजाट. त्या झाडानं जणू अनेक पक्ष्यांना जगण्यासाठी नवं आश्वासक निमंत्रण दिलं होतं. ते आश्वासन कंठोकंठी दूरपर्यंत पोचून भोवतालच्या तप्त वातावरणातून अनेक पक्षी त्या एकमेव थंड झाडाकडं थव्याथव्यानं येत असल्याचं माझ्या लक्षात आलं.

झाडाखाली मुंग्याचंही एक वेगळंच विश्व होतं.अनेकरंगी किडे सुद्धा त्या दलदलीत होते. एकदा पाहत असताना सापाची कात आढळून आली. झाडांवर खारीची वस्ती तर होतीच; पण थंड सावलीत कुत्रीही तिथं विसाव्याला येत. फुलांपासून ते फळांपर्यंतचा सगळा जीवनप्रवास त्या झाडाचा मला पाहायला मिळाला नाही; परंतु शेवटच्या बहरात फुलं लागलेली पाहिली.ही फुलं चिमुकली, मंद गोड वासाची आणि अदभूत फळदार आश्वासन घेऊन आलेली असत. फुलांमुळं लवकरच त्या झाडाभोवती पंखधारी चिमुकल्या पऱ्या उडू लागल्या. फुलपाखरं आणि रंगीत उडते कीटक. फुलचुखे चिमुकले पक्षी आणि भुंगे. एका छोटया फांदीवर मधमाश्यांचं पोळंही रचलं जाऊ लागलं. तेव्हा मात्र खिडकी लावून घ्यावी असं वाटू लागलं; पण त्या माश्यांनी कधी कुणाला दंश केला नाही.

'सजीवांसाठी जीवनदायी केंद्र' अशी त्या लिंबाच्या झाडाची व्याख्या झाल्याचं माझ्या लक्षात आलं; पण इतकंच नव्हे तर, माणसंही त्या झाडाकडं आकर्षित होत होती.

ज्या कुण्या दाक्षिणात्य स्त्रीनं हे लिंबाचे झाड राहत्या घराच्या मागं केवळ भाडेकरू असताना लावलं होतं, तिनं त्या झाडाला कुंपण घातलं नव्हतं. मुक्त-मोकळं झाड, तिनं जणू कडूपणाच्या आणि कंजुषीच्या मर्यादा घातलेल्या नव्हत्या. आसपासचे लोक येत, लिंबाची फळं मुक्तपणे घेऊन जात. फळं कधी कमी पडली नाहीत, फळांनी लगडलेलं ते झाड दृष्ट लागण्यासारखं, समृद्धीची भावना जागवणारं आणि जीवनदायी होतं. सगळ्यांसाठीच!

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

म्हणजे असं की, माणसं, पशु-पक्षी, कीटक, साप, कुत्री आणि खारी, गोगलगाई अशा सगळ्यांनाच ते आकर्षून घेत असे. भोवतालच्या काहिलीतलं विसाव्याचं आणि आनंदाचं जणू आशीर्वादमय आश्वासन आणि जगण्याचा दिलासा...

इतकं महत्त्व त्या झाडाला आलेलं पाहून मी चकित होऊन गेलो होतो. ज्या घराची हकीकत मी सांगतो आहे, ती एक जोड इमारत होती. ट्विन ब्लॉक. शेजारी जे राहत होते, त्यांच्या परसदारी चक्क पाण्याचा हापसा होता म्हणजे भरपूर पाणी होते. मात्र अंगणात आणि परसदारात गवताची काडीही नव्हती. माणसं उदास, दुर्मुखलेली, त्रस्त वाटत. त्या घरातली स्त्री नेहमी दागिने घालून बसे; परंतु पाणी आणि जमीन मुबलक असतानाही त्यांनी हिरवा आनंद पसरवण्याचा प्रयत्न कधी केला नाही. मला वाटतं झाड लावणं, ते जगवणं, त्याद्वारे दूरवर आनंदाचे आणि आश्वासनाचे संगीतमय संदेश पसरवण आणि सर्व सजीवांचे आशीर्वाद घेणं ही एक प्रवृत्तीच असावी लागते. जो माणूस एखादं झाड जगवतो, तो निसर्गात एक 'हिरवा चमत्कार' रुजवत असतो. हे लिंबाचं झाडच बघा ना ! ज्या कुण्या बाईनं हे झाड लावलं होतं, ती बाई इथून निघून गेली होती; परंतु जाताना एक अदभूत नाटय ती आपल्यामागं ठेवून गेली. दरवर्षी, दर ऋतूत त्या झाडाच्या अनुषंगानं एक उत्सव साजरा होत असणार, फुलं येत असणार, घमघमाट दरवळत असणार आणि मग एक आख्खा फलोत्सव... फळांचं लगडणं.. हे सगळं घडत असणार, मी तर केवळ एका ऋतूतला सजीवांच्या जागत्या नांदत्या अस्तित्वाचा साक्षीदार होतो; पण शेजारची ती माणसं? ती अनेक वर्षं त्या घरात राहत आलेली होती; परंतु न त्यांनी ते 'हिरवं कौतुक' पाहिलं, न त्यांनी झाडं लावली, न त्यांनी फुलं फुलवली. हा निसर्गातला आनंद त्यांच्या मनात कधी पोचल्याचं मी पाहिलंच नाही. म्हणूनच कदाचित ती माणसं त्यांच्या परस-अंगणासारखीच उदास, भकास, तपकिरी अशीच वाटत राहिली मनानं.

ते झाड लावणारी ती दाक्षिणात्य बाई एकदा तिच्या मुलासह आमच्या घरी आली होती. तिनं आल्याबरोबर प्रथम जाऊन ते झाड पाहिल. तिचा तो हळवेपणा मला सृजनाशी संबंधित वाटला. मला वाटतं सृजनाशी, नवनिर्माणाशी, निर्मितीशी मन जोडलेलं असेल तर ते ताजं राहतं, झाडांना फुलवणं, रुजवणं, त्यांचा 'हिरवा संदेश' दूरवर पोहोचवणं यातून मन सृजनात्मक आणि आनंदी, निर्मितीक्षम होत असावं. एक मागं ठेवलेलं फळदार झाड किती जिवांना जगवतं, आनंद देत, जीवन देतं, आश्वासन आणि आशीर्वाद देतं हे पाहिलं की मन थक्क होतं. हे मर्म ज्यांनी जाणलं, ते मला वाटतं, आनंदी राहतात. जे नुसते भौतिक गोष्टीचा ध्यास घेतात, दागिने लेवून बसतात, त्यांच्या भोवताली कधी हिरवं झाड उगवत नाही आणि त्यांच्या मनात कधी पक्षी चिवचिवत नाहीत! आनंदापासून ते बिचारे वंचित राहत असावेत.

त्या जीवनदायी झाडानं आपल्या 'हिरव्या भाषेत' मला असं बरंच काही काही सांगितलं.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## शब्दार्थ :-

लगत – जवळ, काटेरी – काटे असलेले, लसलशीत – ताजे, चैतन्यमय – उत्साही, आनंद देणारे, पाणथळ – पाण्याची जागा, शुष्क – निर्जीव, कोरडे, पाणी कमी होणे, राठ. पार्श्वभूमी – मागील जमीन अगोदरची जागा, विलक्षण – अजब, वेगळे दिलासा – आधार, मोरीचे पाणी – न्हाणीचे पाणी, जाई – जाणे, निरखणे – काळजीपूर्वक पाहणे, कौतुकाचा – आवडीचा, पारवा – कबुतर, दृष्टी – नजर, दाक्षिणात्य – दक्षिणेतील, ट्विन ब्लॉक – जोडइमारत, प्रवृत्ती – वागणे,वर्तन, फलोत्सव – फळांचा उत्सव, लगडणे – फळांनी भरून जाणे, मर्म – गुपित गुढ, सृजन – नव निर्मिती, साक्षी असणे – पुरावा असणे, कौतुक करणे – स्तुती करणे, संदेश पसरवणे – सर्वत्र बातमी देणे.

## स्वाध्याय

### I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. घराच्या मागे कोणते झाड होते ?
2. लिंबाच्या झाडाजवळ कोणकोणते पक्षी, प्राणी असत?
3. लिंबाचे झाड कोणी लावले होते ?
4. झाडाला मुक्तपणे वाढवण्यासाठी काय घातले नव्हते ?
5. शेजारची माणसं कशी वाटली?

### II. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. मुलांच्या कौतुकाचा कार्यक्रम कोणता होता?
2. लिंबाचे झाड सर्वांना काय देत होते ?

### III. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. लिंबाच्या झाडाची सजीवांसाठी जीवनदायी केंद्र अशी व्याख्या का झाली होती ?
2. शेजारची माणसे उदास, भकास, तपकिरी का वाटली?

### IV. खालील प्रश्नांची सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.

1. लिंबाच्या झाडामुळे लेखकाला काय काय शिकायला मिळाले ?
2. जीवनदायी झाड हिरव्या भाषेत काय सांगत होते ?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# भाषाभ्यास

**1. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा**

साक्षी असणे, कौतुक करणे,

दिलासा देणे, संदेश पसरवणे.

**2. समानार्थी शब्द लिहा.**

- झाड - 
- पक्षी - 
- प्राणी - 
- पाणी - 

**3. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

ऊन | आनंद | उदास | लहान




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## 2. जंगलाची सफर करून खालील उपक्रम करा.

झाडांचे फायदे

→ 1

→ 2

→ 3

→ 4

→ 5

→ 6

→ 7

### उपक्रम

1. तुम्ही लावलेल्या झाडाचे वर्णन करा.
2. जी.ए. कुलकर्णी यांच्या रूपक कथा वाचा.
3. मारुती चितमपल्ली यांची पुस्तके वाचा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

6

# निरोप

पद्मा गोळे

B1G5F7



**परिचय :-** पद्मा गोळे (1913-1998) ज्येष्ठ कवयित्री. 'नीहार', 'स्वप्नजा', 'प्रीतिपथावर', 'आकाशवेडी', 'श्रावणमेघ' इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'नवी जाणीव', 'रायगडावरील एक रात्र', 'स्वप्न' इत्यादी नाटिका; 'वाळवंटातील वाट' ही कादंबरी प्रसिद्ध.

या कवितेत रणांगणावर जाणाऱ्या आपल्या मुलाविषयीच्या आईच्या अंत:करणातील वीरमातेच्या भावनांचे चित्रण कवयित्रीने कवितेतून केले आहे.

**(मूल्य–स्वातंत्र्य)**



NOT TO BE REPUBLISHED

बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण,
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.

याच विक्रमी बाहुंनी
स्वतंत्रता राखायाची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दुःखाचा,
मीही भारत कन्या
धर्म जाणते वीराचा.



नाही एकही हुंदका
मुखावाटे काढणार,
मीच लावुनी ठेविली
तुझ्या तलवारीस धार.

तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना
शक्ती देईल भवानी
शिवरायांचे स्वरूप
आठवावे रणांगणी.

धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## कवितेचा सारांश :

आई आपल्या मुलाला सीमेवर लढायला जात असताना आनंदाने निरोप देत आहे. आजचा दिवस हा शुभ दिवस आहे. माझ्या पंचप्राणांच्या ज्योतीने तुझे औक्षण करत आहे. याच विक्रमी बाहुने भारतीय स्वातंत्र्याचे रक्षण करावयाचे आहे. तुझ्या बळकट खांद्यावर भविष्याच्या जगाची शांती विसावणार आहे. म्हणून माझ्या डोळ्यात दुःखाचा एकही अश्रू नाही. मी भारतकन्या आहे. सैनिकांचा धर्म मला माहित आहे. तू आज रणांगणावर लढायला जात आहेस तरीही माझ्या गळ्यातून एकही दुःखाचा हुंदका येणार नाही. मी तुझ्या तलवारीला धार लावलेली आहे. तुझ्या पराक्रमाच्या पाठीशी भवानी आईचा आशीर्वाद राहील. तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना माय भवानी उदंड शक्ती देईल. रणांगणावर लढताना तू छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण कर. तू रणांगणावरून शत्रूचा पराभव करून विजयी होऊन घरी येशील तेव्हा मला फार धन्यता वाटेल. त्यावेळी मी माझ्या हाताने आनंदाने दूधभात भरवीन.

**शब्दार्थ :-** रण - युद्ध, तोरण - शुभपताकांची माळ, विक्रमी - पराक्रमी, बाहू - हात, विसावा - विश्रांती, जाणते - समजते, हुंदका - गहिवरणे, मुखावाटे - तोंडावाटे, अशुभ - वाईट गोष्ट. साउली - सावली, छाया, माझिया - माझ्या.

**टिपा:-**

औक्षण - पंचारतीने ओवाळणे, भारतकन्या - भारताची मुलगी, भवानीमाता - भवानीदेवी.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) सैनिकाने रणांगणावर कोणाचे स्मरण करावे?

अ) छ. शिवराय ब) रामदासांचे

क) छ. संभाजी महाराज ड) छ. राजाराम महाराज

2) कवितेतील आई आपल्या मुलाला औक्षण करते, कारण-----------------

अ) मुलाचा वाढदिवस आहे. ब) तो रणांगणावर जात आहे.

क) त्याला बक्षीस मिळाले आहे . ड) त्याचा आठवीमध्ये प्रथम क्रमांक आला आहे.

3) या देवीचा आशीर्वाद सैनिकाच्या पाठीशी आहे.

अ) अंबाबाई ब) भवानी आई क) जोगेश्वरी ड) रेणुका आई

4) कवितेतील आई कोणत्या देशाची कन्या आहे.

अ) श्रीलंका कन्या ब) नेपाळ कन्या क) इंग्लंड कन्या ड) भारत कन्या

5) बाळाच्या खांद्यावर विसावणारी-------------

अ) उद्याच्या जगाची क्रांती ब) भविष्यातील जगाची शांती

क) आजच्या जगाची शांती ड) आजची क्रांती

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) सैनिक कोठे जात आहे?

2) पंचप्राणांच्या ज्योतींनी कोण ओवाळत आहे?

3) कोणाच्या डोळ्यातून दुःखाचा एकही अश्रू आला नाही?

4) आई कोणता धर्म जाणते?

5) सैनिकाला दूधभात कोण भरवणार आहे?

## III. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) मुलगा रणांगणावर जाताना आई काय काय करते?

2) वीरांचा धर्म जाणणाऱ्या आईचे वागणे कसे आहे?

3) आई मुलाला रणांगणावर कोणाचे स्मरण करायला सांगते? व का?

## IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1) रणांगणावर गेलेल्या मुलाकडून आई कोणती अपेक्षा करते?

2) कवितेतील वीर मातेच्या भावना तुमच्या शब्दात लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

1) बाळ, चाललास रणा

घराबांधिते तोरण

2) तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना

शक्ती देईल भवानी

3) धन्य करी माझी कूस

येई विजयी होऊन

# भाषाभ्यास

## अ) समानार्थी शब्द लिहा.

1) घर

2) औक्षण

3) बाहू

4) डोळा

5) मुख

6) सावली

7) शक्ती

8) हात

## ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) सावली

2) दुःख

3) स्वातंत्र्य 4) विजय

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**क) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) निरोप देणे

2) कूस धन्य करणे

**ड) पुढील शब्दांपासून तयार होणारे चार अर्थपूर्ण शब्द लिहा.**

1. चाललास - 1) चाल 2) लस 3) 4)

2. तलवारीला - 1) 2) 3) 4)

**उपक्रम :-**

1) झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची माहिती मिळवून वाचा.

2) 'भारतीय सैनिक' या विषयावर माहिती लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

7

# मी डोलकर

शांता शेळके

D6L6Q4



**परिचय :-** शांता जनार्दन शेळके (1921- 2002) शिक्षण एम. ए. मुंबई येथील महाविद्यालयात मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून काम. शांता शेळके या मराठीतील प्रसिद्ध कवयित्री म्हणून परिचित होत्या. त्यांनी कथा, कादंबरी, कविता, बालसाहित्य इ. वाङ्मय प्रकारात विपुल लेखन केले आहे. 'अनोळख', 'गोंदण', 'तोच चंद्रमा', 'वर्षा' इ. काव्यसंग्रह 'अनुबंध', 'काचकमळ', 'कावेरी', 'मुक्ता' इ. कथा संग्रह 'ओठ', 'पुनर्जन्म', 'भीषण छाया', 'मायेचा पाझर' इ. कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

मी डोलकर ही कविता 'शांताबाईंची गाणी' या काव्यसंग्रहातून घेतलेली आहे. कवितेमध्ये कोळी व कोळयाची पत्नी यांच्यातील प्रेमभावना तसेच समुद्र सौंदर्याच्या निरनिराळया छटा व्यक्त झाल्या आहेत.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**(मूल्य – श्रमसाफल्य)**

मी डोलकर, डोलकर, डोलकर दर्याचा राजा
घर पान्यामंदी बंदराला करतो ये जा || ध्रु ||

आय बापाची लाडाची लेक मी लारी
चोली पीवली गो, नेसलंय अंजिरी सारी
माझ्या केसान गो, मालीला फुलेला चाफा
वास परमालता, वाऱ्यान घेतंय झेपा

नथ नाकात साझीरवानी
गला भरून सोन्याचे मनी
कोलीवाल्याची मी गो रानी
रात पुनवेला नाचून करतंय मौजा || १ ||



या गो दर्याचा दर्याचा दरारा मोठा
जवा पान्यावरी उठतान डोंगर लाटा
कवा उधानवारा शिराला येतंय फारु
कवा पान्यासुनी आबालला भिरतय तारु

वाट बघून झुरते पिरती
मंग दर्याला येतंय भरती
जाते पान्यानं भिजून धरती
येतंय भेटाया तसाच भरतार माझा || 2 ||

भल्या सकाळला आबाल झुकतं हे खाली
सोनं चमचमतंय दर्याला चढते लाली
आमी पान्यामंदी रापण टाकतो जाली
धन दर्याचं लुटून भरतो डाली

रात पुनवेचं चांदण प्याली
कशि चांदीची मासली झाली
माझ्या जाल्यात व्होऊन आली
नेते बाजारा, भरून म्हावरा ताजा || 3 ||

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :-** डोलकर – कोळी, लारी – लाडकी, चोली – चोळी, सारी- साडी, मालीला – माळलेला, फुलैला – फुललेला, परमालता – दरवळतो, झेपा – हेलकावा, साजिरवाणी – चांगली, गला – गळा, पुनव – पौर्णिमा, मौजा – मजा, दरारा – दबदबा, शिराला – शिडाला, उधान – अमावस्या पौर्णिमेला येणारी मोठी भरती, आबाल – आभाळ, तारु – लहान होडी, झुरणे – दुःखाने क्षीण होणे, पिरती – प्रेम, धरती – जमीन, भरतार – पती, नवरा, रापण – मासे धरण्याचे मोठे जाळे, बंदर – जहाज थांबण्याचे ठिकाण, डाली – डाल, बुट्टी टोपली, सकाल – सकाळ, जाली – जाळी, फारू – फाडू

**सारांश :**

हा खेळ सावल्यांचा' या चित्रपटासाठी लिहिलेल्या गीताने लोकप्रियतेचे परमोच्च शिखर गाठले होते. कोळीगीतातली लयबद्ध गोडी हे या गीताचं विशिष्टय ठरावं. या गीतात देखील कथात्मकतेची विण आहे, तिचा बाज प्रश्नोत्तर स्वरूपाचा आहे. लडिवाळीकतेच्या अंगाने जाणारे हे एक युगलगीत आहे, ज्यात ते दोघेही एकमेकासाठी आसक्त झालेयत अन निसर्गाला साक्षीस ठेवून ते साद घालताहेत.

कोकण भूभागात राहणारे डोलकर अर्थात कोळी लोक दर्यावर मासेमारी करून आपली उपजीविका करत असतात. त्यामुळे त्यांचे दर्याशी अतूट असे भावनिक नाते असते. कोळी लोक आपली होडी घेऊन दर्यात दूरवर जातात मासे पकडणारे जाळे टाकून मासे पकडून परत बंदराला येतात हाच त्यांचा जीवनक्रम असतो.

अशा कोळी वस्तीत राहणारी कोळीण स्वतःच्या सौंदर्याविषयी बोलते, मी आई-बाबांची लाडकी लेक आहे. पिवळया रंगाची चोळी आणि अंजिरी साडी नेसलेली आहे. माझ्या केसात चाफा माळलेला आहे त्या चाफ्याचा सुगंध वाऱ्याने वातावरणात दरवळलेला आहे. नाकात नथ आहे.गळा सोन्याने भरलेला आहे म्हणजेच सोन्याचे विविध अलंकार तिने घातलेले आहेत. या कोळी वाडयाची ती राणी आहे. पौर्णिमेला इतर कोळीणीबरोबर आनंदाने नृत्य करत आहे.

दर्याचा (समुद्राचा) दरारा मोठा आहे. या दर्यावरती उंच उंच डोंगराएवढया लाटा निर्माण होतात.उधाण वारा (वेगाचा वारा) जेव्हा होडीच्या शिडात शिरतो तर कधी कधी दर्यावरच्या उंच उंच लाटा व त्यावर असणारी होडी समुद्रकिनाऱ्यावरून आभाळाला टेकल्यासारखी दिसते. तिचा जीव घाबराघुबरा होतो. ती तो सुखरूप यावा असे तिला वाटते. त्याच्या प्रेमासाठी ती झुरते आणि समुद्राला भरती आल्यावर जशी धरती पाण्यानं चिंब भिजून जाते तसाच तिचा भरतार (नवरा) तिला भेटायला परतून येतो.

भल्या सकाळी समुद्राकडे पाहिले तर आकाश समुद्राकडे झुकल्यासारखे दिसते. दर्यावर पडलेल्या सकाळच्या सूर्यकिरणांनी दर्याचे पाणी सोन्यासारखे चमचमते आहे असे वाटते. समुद्राला लाली चढते. कोळी लोक दर्यामध्ये जाळे टाकतात आणि दर्याचे धन (मासे) पकडून टोपल्या भरतात.पुनवेच्या (पौर्णिमेच्या) चांदण्यात रात्र जणू चांदणं प्यायल्यासारखी भासते. यात चमचमणारी मासळी जणू चांदीची भासते. अशी जाळ्यात सापडलेली ताजी मासळी ती बाजारात विकायला घेऊन जाते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# स्वाध्याय

## I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1. कवयित्री शांता शेळके या विषयाच्या प्राध्यापिका होत्या.

   अ) हिंदी    ब) इंग्रजी    क) मराठी    ड) इतिहास

2. 'मी डोलकर' या कवितेचा साहित्यप्रकार हा आहे.

   अ) कोळी गीत    ब) भावगीत    क) भक्तीगीत    ड) प्रेमगीत

3. दर्याचं धन हे आहे.

   अ) मोती    ब) मासे    क) शिंपले    ड) कोळी

## II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. दर्याचा राजा कोण आहे ?
2. कोळी कोठे ये - जा करतो ?
3. दर्याला केव्हा भरती येते ?
4. कोळी केव्हा नाचून मजा करतात ?

## III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन - तीन वाक्यात लिहा.

1. दर्याला लाली कशामुळे चढते ?
2. कोळिणीचा भरतार तिला कशाप्रकारे भेटायला येतो?
3. या कवितेत समुद्राचे विशालपण कसे वर्णन केले आहे ?

## IV. खालील प्रश्नांची उत्तरे पाच - सहा वाक्यात लिहा.

1. कोळिणीचे वर्णन कवयित्रीने कशा प्रकारे केले आहे ?
2. कोळ्याच्या दिनचर्येचे वर्णन करा .

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भाषाभ्यास

**खालील शब्दासाठी प्रमाण मराठी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| म्हावरा | |
| डोलकर | |
| परमालता | |
| आबाल | |
| पिरती | |
| डाली | |

**माहिती मिळवूया**

1. भारतात कोणत्या राज्यांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या राज्यांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.
2. कर्नाटकातील कोणत्या शहरांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या शहरांची नावे आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.

**उपक्रम :-**

1. मी डोलकर हे गीत तुमच्या स्नेहसंमेलनात सादर करा.
2. हे गीत सामुदायिकरित्या गा. किंवा विविध कोळीगीतांचा संग्रह करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 8 महाराणी कित्तूर चन्नम्मा

गोविंद केळकर

I9C4W4



**परिचय :-** गोविंद केळकर (1931 -2018) कविता, कथा, कादंबरी, बालसाहित्य या वाङमय प्रकारात विपुल व सातत्याने लेखन करणारे साहित्यिक. प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नोकरीस प्रारंभ केला आणि मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले. 'बकुळगंध', 'गाऊ गीत नवे', 'जाऊ पंढरीला', 'गंधाली', 'तेजस्विता' इ. कविता संग्रह. 'आतुरले मन वेडे', 'वादळ' इ. कादंबऱ्या, 'हसले मधु चांदणे', 'प्रीत फुले चांदण्यात' कथा संग्रह प्रसिद्ध.

ही कविता 'तेजस्विता' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.या कवितेत कित्तूर राणी चन्नम्माने ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध जो संघर्ष केला त्या लढ्याचा व पराक्रमाचा गौरव केला आहे.

(मूल्य – देशभक्ती)

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



तळपली रणावर अस्मानीची तेजोमय बिजली
मर्दानी राणी चन्नम्मा ही दिव्य महाकाली
घोडयावर झाली स्वार
हातात उभी समशेर
संगरी अतुल ही शूर
करितसे रिपू संहार

इतिहास गातसे अजुन तियेचे गीत विभवशाली
मर्दानी राणी चन्नम्मा ही दिव्य महाकाली
फितुरीचे फिरता वारे
आपुलेच वैरी झाले
ना ढळले धैर्य तरीही
शत्रूदल कुंठित झाले

निज भूमीच्या स्वातंत्र्यास्तव शौर्याने लढली
मर्दानी राणी चन्नम्मा ही दिव्य महाकाली
बंदिवास घडला अंती
लवविली न किंचित मान
आजन्म राखिला हृदयी
या देशाचा अभिमान

दख्खन भूची वीर लक्ष्मी चिरंजीव झाली
मर्दानी राणी चन्नम्मा ही दिव्य महाकाली

**शब्दार्थ :-** रण – युद्ध, बिजली – वीज, समशेर – तलवार, संगरी – युद्धभूमीवर, रिपू – शत्रू, संहार – नाश, फितूरी – दगलबाजी, निज – स्वतः, बंदिवास – कारावास, दिव्य – तेजस्वी, अलौकिक

**टिपा :-** राणी चन्नम्माचा जन्म बेळगावीच्या उत्तरेस दहा कि. मी. अंतरावर असलेल्या काकती या गावी झाला. वडिलांचे नाव धुळाप्पा गौडा आणि आईचे नाव पद्मावती. काकती गावचे हे मातब्बर देसाई घराणे होते. त्यांचे शिक्षण घरीच झाले. राणी चन्नम्मा लहानपणापासूनच धाडसी व पराक्रमी होत्या. त्यांचा विवाह कित्तूरचा राजा मल्लसर्ज यांच्याशी झाला. राणीने ब्रिटिशांच्या विरोधात कित्तूर संस्थानासाठी युद्ध केले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## सारांश -

वीरराणी कित्तूर चन्नम्माने ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध रणांगणावर जो पराक्रम शौर्य दाखविले त्याचे वर्णन या कवितेत आलेले आहे. ब्रिटिशांच्या सैनिकांबरोबर युद्ध करत असताना आस्मानी तेजोमय बिजली चमकावी त्याप्रमाणे राणी रणांगणावर लढत होती. वीर राणी कित्तूर चन्नम्माच्या ठिकाणी असलेला पराक्रम, धाडस, शौर्य, देशभक्ती व अन्यायाविरोधात लढण्याची हिंमत, ब्रिटिशांच्या विरोधात असणारा असंतोष हे तिचे दिव्य स्वरूप महाकालीचेच वाटते. वीरराणी कित्तूर चन्नम्मा घोडयावर स्वार होऊन हातात उभी तलवार घेऊनआपल्या अतुल्य अशा पराक्रमांने शत्रुंचा संहार करीत होती.

तिच्या या पराक्रमाचे वैभवशाली गीत आजही गायले जाते. ब्रिटिशांच्या विरोधात लढाई करताना वीरराणीचे सैनिक शत्रूला म्हणजेच ब्रिटिशांना फितूर झाले. तरीही वीरराणी डगमगली नाही. तिचे धैर्य ढळले नाही. अशा परिस्थितीत तिने पराक्रमाने शत्रूशी दोन हात केले. तिचा हा पराक्रम पाहून शत्रूदलही कुंठीत झाले.

आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी शौर्याने लढली. मर्दानी राणी कित्तूर चन्नम्मा भव्य दिव्य महाकाली होती. ब्रिटिशांनी राणी चन्नम्माला पकडले व बंदिवासात ठेवले तिने ब्रिटिशांच्याकडे कधीही क्षमायाचना केली नाही. स्वाभिमानाने कैदेत राहिली. राणीने चिरंतन आपल्या देशाचा अभिमान कायम ठेवला. दख्खनची पराक्रमी वीरराणी कित्तूर चन्नम्मा कायमची चिरंजीव झाली.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) महाराणी कित्तूर चन्नम्मा ही कविता या काव्यसंग्रहातून निवडली आहे.

अ) जाऊ पंढरीला   ब) बकुल गंध   क) तेजस्विता   ड) गंधाली

2) 'समशेर' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे.

अ) युद्धभूमी.   ब) तलवार   क) खग   ड) सव्वाशेर

3) राणी चन्नम्मा कशावर स्वार होऊन लढली.

अ) अंबारी   ब) रथामध्ये   क) घोडयावर   ड) हत्तीवर

4) राणी चन्नम्माने कोणाविरुद्ध संघर्ष केला?

अ) ब्रिटिश   ब) पोर्तुगीज   क) डच   ड) फ्रेंच

5) राणी चन्नम्मा शौर्याने यासाठी लढली.

अ) धन ब) संपत्ती क) स्वातंत्र्य ड) यापैकी नाही

## II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) शत्रूंचा संहार कोण करते?

2) इतिहास कोणाचे गीत गात आहे?

3) कित्तूर राणी चन्नम्माला कोणत्या देवीची उपमा दिली आहे?

## III. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) कित्तूर राणी चन्नम्मा शत्रूशी कशी लढाई करत होती ?

2) वीरराणी कित्तूर चन्नम्मा का डगमगली नाही?

3) राणीने आपल्या देशाचा अभिमान कसा कायम ठेवला?

4) राणी चन्नम्माने ब्रिटिशांविरुद्ध कसा लढा दिला?

## IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1) या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

## V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

1) घोडयावर झाली स्वार
हातात उभी समशेर.

2) फितुरीचे फिरता वारे
आपुलेच वैरी झाले.

3) बंदिवास घडला अंती
लवविली न किंचित मान.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## भाषाभ्यास

**अ) समानार्थी शब्द लिहा.**

1) समशेर 2) रण 3) धैर्य 4) शत्रू

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

1) वैरी 2) मान 3) स्वातंत्र्य 4) मित्र

**क) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) संहार करणे -

2) कुंठीत होणे -

3) बंदिवास होणे -

**उपक्रम -**

1) भारताच्या स्वातंत्र्य लढयात कर्नाटकातील थोर महिलांचे योगदान लिहा.

2) भारतीय स्वातंत्र्य लढयात भाग घेतलेल्या थोर स्त्रियांची यादी तयार करा.

3) वीरराणी कित्तूर चन्नम्मा विषयी माहिती लिहा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 9 लाभले आम्हास भाग्य

**सुरेश भट**

F9E9K7



**परिचय :-** सुरेश भट (1932-2003) कवी, गझलकार व पत्रकार. त्यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रूढ केला. त्यामुळे त्यांना 'गझल सम्राट' असे मानाने संबोधले जाते. फारसी आणि उर्दूचा स्वीकार करणारी त्यांची गझल आहे. रूपगंधा, रंग माझा वेगळा, एल्गार इ. कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

मराठीवर त्यांचे निस्सीम प्रेम होते. त्यावरील प्रेमातूनच त्यांनी मराठीवर ही कविता लिहिली आहे. त्यांची ही गझल मराठी राजभाषादिनी तर आवर्जून ऐकू येते. आज मराठी भाषा अभिमान गीत म्हणून हे गायले जाते. 'सुरेश भटांची संपूर्ण कविता' या पुस्तकातून ही कविता संपादित करून घेण्यात आली आहे.

**(मूल्य : भाषाप्रेम)**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामनांत दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसांत नाचते मराठी




आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी
आमुच्या मुलामुलींत खेळते मराठी
आमुच्या घराघरांत वाढते मराठी

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलात हासते मराठी
येथल्या दिशादिशात दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरात राहते मराठी

पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी......
आपुल्या घरात हाल सोसते मराठी
हे असे कितीक 'खेळ' पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :-** भाग्य - नशीब, जाहलो - झालो, माय - आई, दंग होणे - एखाद्या कामात किंवा विषयात पूर्णपणे गढून जाणे, ऊर - छाती, नस - शरीरातील अशुद्ध रक्त हृदयाकडे वाहून नेणारी रक्तवाहिनी, रग - शरीराच्या अवयवात उठणारी तिडीक किंवा राहूनराहून सतत होणारी वेदना, नग - पर्वत; वस्तू, नभ - आकाश, आभाळ, चराचर - हालचाल करणारे व न करणारे, हाल सोसणे - त्रास सहन करणे, मदांध - उन्मत, तख्त - राजाचे बसावयाचे आसन.

**कवितेचा आशय :-** मराठीला शेकडो वर्षाचा इतिहास असून मायबोली मराठी विविधतेने बहरत फुलली आहे. अनेक वाङमय प्रकारांनी ती समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली ती मराठी भाषेतून. ती मराठी माझी मायबोली आहे हे मी माझे भाग्य समजतो. ती बोलण्याचे तसेच ऐकण्याचे भाग्य आम्हास लाभले हे स्वतःला धन्य समजतो एवढया जगात मायबोली मराठीलाच मानतो

मराठीने संपूर्ण शरीर व्यापले आहे. ही आमच्या मनामनात वसते रगारगात, उराउरात, नसानसात रंगते, स्पंदते व नाचते मराठी. संपूर्ण शरीराला व्यापलेली मराठी आहे.

आमच्या लहान लहान बाळात जन्मते मराठी. आमच्या रांगणाऱ्या मुलात रांगते मराठी आणि येथे मुला-मुलींच्या खेळात खेळते मराठी, घराघरात मराठी वाढत आहे. समाजातील सर्व स्तरात मराठी भाषा विकसित होत आहे, समृद्ध होत आहे.

आमच्या मराठी कुटुंब कुटुंबात नांदते मराठी, बोलतो मराठी, येथल्या प्रत्येक फुलाफुलातून हसते मराठी. दहा दिशातून दाटते मराठी, येथल्या नगानगात गर्जते मराठी निसर्गातील नभातून, फुलातून, दिशातून, प्रत्येक घराघरातून नांदते मराठी.

दरीखोऱ्यातून हिंडते मराठी, वना वनात गुंजते मराठी, तरुलतात सौंदर्याने नटलेली मराठी, कळीकळीतून लाजते मराठी. थोडक्यात दऱ्याखोऱ्यात, वना वनात वास्तव्यास असलेले सगळेजण मराठी भाषा बोलत आहेत, अशी ही मराठी भाषा सौंदर्याने सजलेली व लाजणारी मराठी भाषा आहे.

येथील नभानभातून वर्षते मराठी, पिकापिकातून डोलते मराठी, नद्या-नद्यातून वाहते मराठी, येथल्या चराचरातून नांदते मराठी, निसर्गाला व्यापून राहिलेली मराठी भाषा आहे. निसर्गात सर्वत्र मराठी भाषा आहे.

या मराठी भाषेने असंख्य पाहुण्यांना पोसलेले आहे. अनेक परकीय लोकांचे पोषण मराठी भाषेने केलेले आहे. पण स्वतःच्या घरात मात्र हाल सोसत आहे. मराठी भाषेकडे दुर्लक्ष होत आहे. असे अनेक खेळ मराठी भाषेने पाहिले आहेत. मायबोली मराठी अत्यंत सामर्थ्यशील व पराक्रमी आहे. मराठीने अहंकारी राजांचा पराभव केलेला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

### I. जोडया जुळवा

| अ | ब |
|---|---|
| 1. उराउरात | अ) वर्षते |
| 2. लहानग्यांत | ब) राहते |
| 3. फुलाफुलांत | क) रांगते |
| 4. नभामधून | ड) स्पंदते |
| 5. चराचरात | इ) हासते |

## II. खालील पैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा.

1. लाभले आम्हास भाग्य .. या कवितेचा साहित्यप्रकार हा आहे.

   अ) कोळीगीत   ब) ग्रामीण कविता   क) भाव कविता   ड) गझल

2. या कवितेचे मूल्य आहे.

   अ) देशभक्ती   ब) भाषाप्रेम   क) प्रामाणिकपणा   ड) श्रम साफल्य

3. मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार यांनी रूढ केला.

   अ) मंगेश पाडगावकर   ब) वि. स. खांडेकर   क) सुरेश भट   ड) विंदा करंदीकर

## III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उतरे लिहा.

1. या जगात कवी कोणाला माय मानतो ?
2. मराठी कोठे दंगते ?
3. मराठी कोठे नाचते ?
4. मराठी कोठून वाहते ?
5. आपुल्या घरात कोण हाल सोसते ?

## IV. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1. मराठी भाषेचा अभिमान कोणत्या शब्दांत व्यक्त केलेला आहे.
2. आपण मराठी भाषेचा अभिमान का बाळगला पाहिजे ?

## V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

1. या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

## VI. संदर्भासाहित स्पष्टीकरण करा.

1. धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
2. येथल्या पिकामधून डोलते मराठी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भाषाभ्यास

**अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

माय, मन, नाच, फूल, नभ, नदी, हाल, तख्त

**उपक्रम :**

1. मराठी भाषविषयी लिहिलेली गीते मिळवून वाचा.
2. मराठी भाषेच्या उत्पत्तीबाबत शिक्षकांकडून माहिती मिळवा.
3. 27 फेब्रुवारी हा कवी कुसुमाग्रज उर्फ विष्णु वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन साजरा करा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

10

# संपर्क

**आबासाहेब नि. पाटील**

K2K5M6



**परिचय :-** आबासाहेब नि. पाटील (जन्म - 1971) साली मंगसुळी जि. बेळगाव मध्ये जन्म. व्यवसाय: शेती. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून मराठीत एम. ए. केले. 'साध्या माणसाच्या कविता', 'घामाची ओल धरुन' हे कविता संग्रह प्रकशित. कर्नाटक व गोवा येथील मुख्य व्यासपीठावरून काव्यवाचनाचे कार्यक्रम केले. आकाशवाणी व दूरचित्रवाणीवर काव्यवाचन. विविध दिवाळीअंक व साहित्यपत्रिकेतून कविता व कवितेवरची आस्वादने प्रकाशित झाली आहेत. सांगली (औदुंबर) अमृतमहोत्सवी साहित्य संमेलनातील कवीसंमेलनात अध्यक्षपदाने सन्मानीत. कवी सुधांशु, गदिमा, कवी कालिदास, पद्मश्री नामदेव ढसाळ, शंकर पाटील सृजनरत्न पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

'घामाची ओल धरुन' या कवितासंग्रहातून ही कविता संपादित केली आहे. कवितेचा साहित्य प्रकार 'ग्रामीण कविता' हा आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य-लढा)**

दुथडी नदीला पूर  
दूरच्या दूर पसरले पाणी  
हा पाऊस आला  
कुठून वैऱ्यावाणी



पाण्यात हरवली घरे गुरे-वासरे
पिके अन् पक्षी
डोहावर डुलते
प्रेत फुलांची नक्षी

लाटेने गिळली वाट
विखुरले काठ
पूलही तुटले
जगण्याचे अमृत
कसे जीवावर उठले



मदतीला आली नाव
तिचा ना ठाव
ठिकाणा आहे
बुडताना कळले
तीच पुरातून वाहे

प्रार्थना करावी कुठे
हा टाहो फुटे
मुक्या वाचेचा
संपर्कच तुटला
कसा तुझ्या कृपेचा

**सारांश :-**

निसर्गाच्या कुशीत मानवाला रमायला आवडते. निसर्ग आणि मानवाचे नाते रेशमी बंधासारखे आहे. दोघेही एकमेकांवर अवलंबून असतात. निसर्ग नेहमी मानवाचा गुरु आहे. तो सतत देण्याचे कार्य करत आहे. उदार आहे. सर्व काही मानवाला देत राहतो पण मानवाने निसर्गाचा अति वापर केला आहे. मानवाने प्रमाणापेक्षा जास्त नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर केला आहे. मानवाच्या विकृतीमुळे निसर्गाचा प्रकोप मानवावर झाला आहे. मानवावर निसर्गाची अनेक संकटे आली आहेत. ती म्हणजे वादळ,अतिवृष्टी, अनावृष्टी, भूकंप, दुष्काळ, महापूर, ओला दुष्काळ इतर अशा संकटांनी मानव जेव्हा बळी पडतो तेव्हा या परिस्थितीवर अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून लेखन केले आहे. त्यापैकी आबा पाटील यांनी महापुरावर आधारित 'संपर्क' ही कविता लिहिलेली आहे.

कवी आबा पाटील यांनी 2019 मध्ये आलेल्या महापुराच्या संकटामुळे झालेले नुकसान व झालेली मानवाची स्थिती या कवितेतून व्यक्त केली आहे. पाऊस वैऱ्यासारखा येऊन प्रचंड प्रमाणात पाणी सर्वत्र दिसू लागले या महापुरामध्ये आलेल्या पाण्यामध्ये वासरे,पिके,पक्षी सर्व बुडून गेले आहेत. याच पाण्यावरती डोहा मधून अनेक प्रेते  फुलांच्या नक्षीप्रमाणे वाहू लागली. या प्रेतांना येणाऱ्या प्रत्येक लाटेने झुलवलेले आहे. नदीकाठ सारा विखुरलेला दिसून येतो. नदीवर बांधलेले पुल पाण्याच्या प्रवाहामुळे तुटले आहेत. जे पाणी जगण्यासाठी अमृत म्हणून वापरले जाते. तेच पाणी आज विष बनून माझ्या जीवावर उठले आहे. या प्रसंगातून वाचण्यासाठी मानवाच्या मदतीला नाव येते पण त्याच नावेचा ठाव ठिकाणा लागत नाही. अशा परिस्थितीमध्ये मानवाने कोणाकडे प्रार्थना करावी कारण चारी बाजूंनी संकट मानव जातीसमोर उभारलेले आहे. आजपर्यंत ज्याची प्रार्थना करून जगले त्यालाच आज प्रार्थनेची हाक ऐकू येत नाही. या प्रसंगाने तो मुका,अबोल झाला आहे. वाचा गेली आहे. सर्वत्र संपर्क तुटला आहे. अशा परिस्थितीत तुझाही संपर्कच कसा तुटला ? असा आर्त प्रश्न ते परमेश्वराला विचारतात.

**शब्दार्थ :–** दुथडी - दोन्ही बाजू भरून, पूर - जास्त पाणी येणे,  वैयावाणी - शत्रूप्रमाणे, डोहा - खळगा, खड्डा  गिळली -  गिळणे  विखुरले - पसरणे ,  अमृत - संजीवनी, ठाव - पत्ता, ठिकाण वाहे - वहाते, वहाणे, टाहो - आक्रोश, ओरडणे  मुक्या - न बोलणे, अबोल कृपेचा - आशीर्वाद.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**I. खालील प्रश्नांना योग्य पर्यायी उत्तरे लिहा.**

1. ‘संपर्क’ या कवितेचे कवी कोण?

   अ) आबा पाटील   ब) कुसुमाग्रज   क) भरत सासणे   ड) तुकाराम

2. पूर कसा आला आहे?

   अ) वैऱ्यावानी   ब) मित्रासारखा   क) माहेरवाशिणीसारखा   ड) सहज

3. प्रेते कशी दिसत होती?

   अ) फुलासारखी   ब) नक्षीसारखी   क) रांगोळीसारखी   ड) चित्रासारखी

**II. खालील प्रश्नांना एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. संपर्क कवितेचे मूल्य सांगा?
2. या कवितेतून कशाचे वर्णन केले?
3. पूल कशामुळे तुटून गेला ?

**III. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1. ‘प्रेत फुलांची नक्षी लाटेने गिळली वाट विखुरले काठ’
2. ‘मुक्या वाचेचा संपर्कच तुटला कसा तुझ्या कृपेचा’

**IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे द्या.**

1. महापुरामुळे झालेल्या परिस्थितीचे वर्णन करा?
2. महापुराची कारणे कोणती?

**उपक्रम :–**

1. महापूरग्रस्त लोकांची मुलाखत घ्या.
2. महापूरावर लिहिलेल्या कविता संग्रहित करा.
3. महापूर या विषयावर निबंध लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## चित्र पाहून माहिती लिहा.



## हे शब्द असेच लिहा.

| |
|---|
| **महापूर, दुष्काळ, नक्षी, पक्षी, जीवन** |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## पूरक वाचन

## 3 तोत्तोचान

**मूळ लेखक - तेत्सुको कुरोयानागी**

**मराठी अनुवाद - चेतना सरदेशमुख गोसावी**



**परिचय :-** तोत्तोचान हे मूळ जपानी भाषेतील पुस्तक आहे. लेखिका तेत्सुको कुरोयानागी या जपानी दूरदर्शन कलाकार आणि युनिसेफच्या सदभावना दूत आहेत. या पुस्तकात लेखिकेने आपल्या तोमोई या शाळेतले अनुभव तसेच शाळेचे मुख्याध्यापक सोसाकू कोबायाशी यांच्याबद्दल सांगितले आहे. पुस्तकातल्या कथानकाचा काळ हा दुसऱ्या महायुद्धादरम्यानचा आहे. या पुस्तकाचा अनेक भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. याचा मराठी अनुवाद चेतना सरदेशमुख गोसावी यांनी केला आहे.

आईच्या काळजीला तसंच कारण होतं. तोत्तोचान खरं तर नुकतीच शाळेला जायला लागली होती आणि तिला शाळेतून काढूनही टाकलं होतं. फक्त पहिलीत असूनही ! मागच्या आठवडयातली गोष्ट आईला तोत्तोचानच्या बाईंनी बोलावलं होतं. आई येताच त्यांनी सरळ मुद्याला हात घातला. तुमची मुलगी अख्या वर्गाचे लक्ष विचलित करते हो. तुम्ही कृपा करून तिला दुसऱ्या शाळेत घाला. "माझी सहनशक्ती खरच संपली आता".

आईला धक्का बसला तोत्तोचानने असं सगळ्या वर्गाला त्रास होण्यासारखे केलं तरी काय ? पहिली गोष्ट म्हणजे, ती तिचा डेस्क शंभर वेळा तरी उघडते आणि बंद करते. कारण नसताना उगाचच हे तिचं चालू असतं. तिच्या डेस्कशी ती खेळत नसते तेव्हा ती वर्गात उभी असते खिडकीपाशी. रस्त्यावरच्या बँडवाल्यांना बोलवण्यासाठी. बँडवाले नसतील त्या दिवशी ती झाडावरील चिमण्यांशी बोलत असते.

बाई उठल्या, " मी एकटीच वैतागलेय असं नाही. शेजारच्या वर्गातल्या बाईंनाही त्रास झाला आहे. शाळेतून काढल्याचं आईनं तोत्तोचानला सांगितलं नव्हतं, कारण तिला तिची चूक काय झाली हे समजलं नसतं. आई फक्त एवढंच म्हणाली तुला नवीन शाळेत जायला आवडेल ? "मी एका खूप छान शाळेबद्दल ऐकलंय".

नव्या शाळेच्या फाटकापाशीच तोत्तोचान थांबली. ती पूर्वी ज्या शाळेत जायची त्या शाळेच्या दाराला सिमेंट-काँक्रीटचे मोठे खांब होते. आणि त्यावर शाळेच्या नावाची मोठ्ठी पाटी होती. पण ह्या नव्या शाळेच्या दाराला मात्र दोन छोटेसे खांब होते. आणि त्यावर फांद्या आणि पानं उगवली होती.

"हे दार अजून वाढतंय वाटतं. हे बहुतेक टेलिफोनच्या खांबापेक्षाही उंचहोईल का ग आई?"

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

ते दोन खांब म्हणजे चक्क दोन झाडंच होती. ती त्यांच्याजवळ गेली, तेव्हा तिला वाऱ्यामुळे एका बाजूला कललेली छोटीशी पाटी दिसली, "तोमोई विद्यालय." "तोमोई म्हणजे काय?" अस ती विचारणार एवढयात तिला जे दिसलं ते पाहून आपण स्वप्नात तर नाही ना असंच तिला वाटलं. तिनं झुडपांच कुंपण जरा बाजूला करुन नीट पाहिलं, पण तिचा तिच्या डोळयांवर विश्वासच बसेना.

"आई, त्या मैदानात, तिकडे आगगाडी आहे का गं खरोखरीची?"

त्या शाळेमध्ये वर्ग म्हणून आगगाडीच्या सहा जुन्या डब्यांचा उपयोग केला होता. तोत्तोचानला तर आगगाडीतली शाळा म्हणजे स्वप्नात आल्यासारखं वाटत होतं.. 'वर्गाच्या खिडक्या सकाळच्या कोवळया उन्हात चकाकत होत्या आणि त्याहून जास्त झुडपांमधून त्यांच्याकडे पाहणाऱ्या गुलाबी गालांच्या एका चिमणीचे डोळे एका वेगळयाच आनंदान लकाकत होते.

"मला शाळा खूप आवडली"

एका क्षणात तोत्तोचानने त्या कुकुगाडीतल्या शाळेकडे पळायला सुरुवात केली. पळता पळता मागे वळून तिने आईला म्हटले, "आई लौकर ये, ही बघ नं गाडी थांबलीय," आपण त्यात बसू या.

बिचारी आई तिला पकडण्यासाठी धावत सुटली. सुदैवानं आई शाळेत असताना बास्केटबॉलच्या संघात होती. त्यामुळे ती तोत्तोचानहून अधिक जोराने धावली आणि तिनं लवकरच तोत्तोचानला गाठलं.

"हे बघ, आत्ताच तुला या गाडीत बसता येणार नाही," आईनं समजावून सांगितलं.

"हे डबे म्हणजे वर्ग आहेत इथले, आणि अजून तर तुझं नाव शाळेत घातलही नाहीए आपण, तुला जर खरच या डब्यात बसायचं असेल तर तू मुख्याध्यापकांशी नम्रतेनं आणि नीट बोलायला हवं. आपण आता त्यांच्याकडेच जाऊ या आणि तू चांगलं वागली तरच तुला या शाळेत घेतील, समजल?"

'कुकुगाडीत बसू दिलं नाही म्हणून खरं तर तोत्तोचानला खूप वाईट वाटल होत. पण तिनं आई म्हणेल तसं ऐकायचं ठरवलं होतं. "समजलं."ती म्हणाली. “मला ही शाळा खूप आवडलीय."

आईच्या मनात आलं, हिला सांगावं, की तिच्या आवडण्याचा आणि न आवडण्याचा प्रश्नच नाही आहे. मुख्याध्यापकांना ती आवडते की नाही हे महत्त्वाचं आहे. पण ती काहीच बोलली नाही. तिनं तोत्तोचानचा हात धरला आणि सरळ मुख्याध्यापकांच्या खोलीकडे चालायला सुरुवात केली. सगळे गाडीचे डबे आता सकाळचे वर्ग सुरु झाल्याने शांत होते. भिंतीच्या ऐवजी शाळेच्या सर्व बाजूंनी झाडं होती. आणि मैदानावर जिकडे तिकडे लाल-पिवळया फुलांचे ताटवे फुललेले होते.

मुख्याध्यापकांची कचेरी मात्र आगगाडीच्या डब्यात नव्हती. ती उजव्या हाताला एका अर्धवर्तुळाकार ओटयावर असलेल्या एकमजली इमारतीमध्ये होती. आईचा हात सोडून तोत्तोचान पळतच सात-आठ पायऱ्या चढली आणि अचानक थांबून तिनं वळून आईकडं पाहिलं.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

"काय ग झाल?" हिनं विचार तर बदलला नाही नं, या भीतीन आईनं विचारलं.

एक पायरी चढून तोत्तोचाननं हळूच आईच्या कानात विचारलं, "आई, आपणआता ज्यांना भेटणार आहोत ते स्टेशनमास्तर आहेत का गं?"

आईलाही जरा गंमत करण्याची लहर आली.

तिनही गंभीरपणे हलक्या आवाजात विचारलं, "का गं?"

तोत्तोचाननं दबक्या आवाजात सांगितलं, "तू म्हणालीस की ते मुख्याध्यापक आहेत, पण या सगळ्या कुकुगाड्या त्यांच्या असतील तर ते नक्कीच स्टेशनमास्तर असणार."

रेल्वेच्या डब्यात शाळा हे जरा विचित्रच. हे आईलाही मान्य होतं. पण आता समजावत बसायला वेळ नव्हता.

ती म्हणाली, "तू त्यांनाच का नाही विचारत? आणि हे बघ, तुझे बाबा नाही का व्हायोलिन वाजवत, म्हणून त्यांच्याकडे किती प्रकारची व्हायोलिन आहेत की नाही? म्हणून आपलं घर काय लगेच व्हायोलिनचं दुकान होतं का?" ते तोत्तोचानला पटलं. आईचा हात धरून ती निघाली.

आई आणि तोतोचान खोलीत  शिरल्याबरोबर  खुर्चीत बसलेले गृहस्थ त्यांच्या स्वागतासाठी उठले.

त्यांना घाईघाईने झुकून नमस्कार करत तोतोचाननं उत्साहानं विचारलं, "तुम्ही मुख्याध्यापक आहात की स्टेशनमास्तर?"

आईला ओशाळल्यासारखं झालं ,पण ती काही बोलण्याच्या अगोदरच ते हसून म्हणाले," मी या शाळेचा मुख्याध्यापक आहे." तोत्तोचान खूष झाली.

"किती छान!''  ती म्हणाली.

मुख्याध्यापकांनी तिला बसायला खुर्ची दिली आणि आपली खुर्ची पुढे ओढून घेतली आणि तिच्यासमोर बसत ते म्हणाले, "हं आता मला तुझ्याबद्दल सांग". "तुला काय हवं ते सांग". तोत्तोचान मनापासून बोलली खूप बोलली. पुढे काय बोलावे तिला सुचेना, तेवढयात मुख्याध्यापक उठले आणि प्रेमळ हाताने तिचा खांदा थोपटत म्हणाले, "आजपासून तू या शाळेची विद्यार्थिनी झालीस हं."

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## व्याकरण

# 5 वृत्त

तुमच्या पाठयपुस्तकामध्ये तुम्ही धडे वाचता, कविता वाचता. धडे आणि कविता म्हणजेच गद्य आणि पद्य यांच्या रचनेत फरक आहे, हे तुम्हांला माहीत आहे. हा फरक असतो मुख्यत: लयीचा. पद्य गाता येते किंवा लयीत वाचता येते. गद्याचे तसे नसते. लय निर्माण कशी होते? कोणत्या गोष्टीमुळे होते ? वृत्त, छंद यांसारख्या गोष्टींमुळे कवितेला लय मिळते. कवितेतील ऱ्हस्व, दीर्घ स्वरांचा जो एक विशिष्ट क्रम वापरला जातो, त्याला ‘वृत्त’ म्हणतात. याचाच अर्थ असा, की कविता एका विशिष्ट वृत्तामध्ये रचलेली असते, म्हणूनच कविता आपल्याला लयीत म्हणता येते. वृत्तासंबंधीच्या काही महत्त्वाच्या संकल्पना समजून घेऊया.

**खालील तक्ता अभ्यासा**

| व्याकरणातील संज्ञा | लघु | गुरू |
|---|---|---|
| अक्षरे | ऱ्हस्व अक्षरे | दीर्घ अक्षरे |
| अक्षरे – स्वर | अ, इ, उ, ऋ | आ ई ऊ ए ऐ ओ औ |
| स्वरयुक्त अक्षरे | क कि कु कृ | का की कू के कै को कौ |
| संकेत खुण | अर्धचंद्र U | आडवी रेषा -- |

**उदा :** पसारा काकडी मदन पाटण वैशाली

लघुगरूक्रम U - - - U - UUU - U U - - -

वृत्तांतील लघुगुरूक्रम ठरवण्याचे काही नियम आहेत.

(1) ‘पुस्तक’ या शब्दातील लघुगुरूक्रम (- UU ) असा आहे, कारण ‘पु’ हे लघू असले, तरी पुढच्या ‘स्त’ या जोडाक्षराचा आघात मागील लघु अक्षरावर येतो. त्यामुळे ते गुरू समजावे. जर असा आघात येत नसेल, तर ते अक्षर हस्व आहे ते ऱ्हस्वच (लघु) राहते.

(2) जोडाक्षरयुक्त शब्दातील शेवटचा वर्ण ऱ्हस्व असेल, तर ते जोडाक्षर ऱ्हस्व मानावे.

उदा., भास्कर (- U U ) दीर्घ असेल, तर दीर्घ उदा., इच्छा (- -)

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

(3) लघु अक्षरावर अनुस्वार येत असेल किंवा त्यानंतर विसर्ग येत असेल तर ते गुरू मानावे. उदा., नंतर (— U U ) दुःखी (- -)

(4) कवितेच्या चरणातील शेवटचे अक्षर लघु असले तरी दीर्घ उच्चारले जाते. त्यामुळे ते गुरू मानतात.

मराठी पद्यरचनेतील वृत्तांचे तीन प्रकार

1. अक्षरगणवृत्ते 2) मात्रावृत्ते 3) छंदवृत्ते

या इयत्तेत आपल्याला अक्षरगणवृत्ते शिकायची आहेत. ज्या वृत्तांतील अक्षरांची संख्या ठरावीक असते व त्या अक्षरांचा लघुगुरुक्रम सुद्धा ठरावीकच असतो, त्या वृत्तांना अक्षर गणवृत्तअसे म्हणतात.

**गण निश्चितीसाठी काही संकल्पना :-**

चरणातील तीन-तीन अक्षरांचे मिळून गण तयार होतात. उर्वरित प्रत्येक अक्षराचा स्वतंत्र गण पाडावा. य, र,त, न, भ, ज, स, म असे एकूण आठ गण आहेत. गण म्हणजे कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप. लघुगुरुक्रमानुसार हे गण ठरतात. यात प्रत्येक गणाच्या आरंभीच्या अक्षरापासून गणाचे नाव ठरते. उदा.‘य’ गण म्हणजे ‘यमाजी’.य, मा, जी यात ‘य’ हे अक्षर लघू आणि ‘मा’, ‘जी’ ही अक्षरे गुरू आहेत.

उच्चार सुलभ व्हावा म्हणून पद्याच्या चरणातील ज्या ठिकाणी थांबायचे असते त्याला ‘यती’ असे म्हणतात. यती प्रत्येक चरणाच्या शेवटी व कधी कधी मध्येही असतो.

**लघुगुरूक्रम ओळखण्यासाठी खाली दिलेल्या गणांचा तक्ता पहा.**

| गण | गणाचे नाव | लघु गुरू क्रम |
|---|---|---|
| य गण | यमाजी | आद्यलघु |
| र गण | राधिका | मध्यलघु |
| त गण | ताराप | अंत्यलघु |
| न गण | नमन | सर्वलघु |
| भ गण | भास्कर | आद्यगुरू |
| ज गण | जनास | मध्यगुरू |
| स गण | समरा | अंत्यगुरू |
| म गण | मानवा | सर्वगुरु |

• आता आपण इंद्रवज्रा, भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका या अक्षरगणवृत्तांचा अभ्यास करणार आहोत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# इंद्रवज्रा

**वृत्ताची लक्षणे**

या वृत्तात चार चरण असतात

याच्या प्रत्येक चरणात 11 अक्षरे असतात

यती 5 व्या अक्षरावर येतो

इंद्रवज्रा वृत्ताचे गण – त त ज ग ग असे पडतात

उदा :- दुःखी जगा देखुनिया द्रव ते

सच्चित्त माते नवनीत वाटे

अन्याय कोठे दिसता परी ते

त्या इंद्रवज्रासहि लाजवीते

त्याइं द्र वज्रा स हि ला ज. वी ते

| | | | |
|---|---|---|---|
| त्या इं. द्र | व ज्रा स | हि ला ज | वी ते |
| - - U | - - U | U - U | - - |
| त | त | ज | ग ग |

**खालील ओळीचे गण पाडा**

जो नित्य देवास भजे स्वभावे

त्या मानवा देव सदैव पावे

# भुजंगप्रयात

वृत्ताची लक्षणे

या वृत्तात चार चरण असतात.

प्रत्येक चरणात 12 अक्षरे असतात.

यती 6 व्या व 12 व्या अक्षरावर असतो.

भुजंगप्रयात वृत्ताचे गण- य-य-य-य असे पडतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदा., मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे ।
मना बोलणे नीच सोशीत जावे ।।
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे ।
मना सर्व लोकांसि रे नीववावे ।।

म ना स र्व लो कां सि रे नी व वा वे

| | | | |
|---|---|---|---|
| म ना स | र्व लो कां | सि रे नी | व वा वे |
| U - - | U - - | U - - | U - - |
| य | य | य | य |

**खालील ओळींचे गण पाडा.**

अ) मना सज्जना तू कडेनेच जावे.

आ) सदा सर्वदा योग तूझा घडावा.

## वसंततिलका

@MSBS NOT TO BE REPUBLISHED

**वृत्ताची लक्षणे**

अ) या वृत्तात चार चरण असतात.

आ) प्रत्येक चरणात 14 अक्षरे असतात.

इ) यती 8 व्या व 14 व्या अक्षरावर असतो.

ई) या वृत्ताचे गण- त-भ-ज-ज-ग-ग असे पडतात.

उदा., द्रव्यास हे गमन-मार्ग यथावकाश ।
की दान भोग अथवा तिसरा विनाश ।
जो घे न भोग- जरि पात्र करी न देही।
त्याच्या धनास मग केवळ नाश पाही ।।

त्या च्या ध ना स म ग के व ळ ना श पा ही

| | | | | |
|---|---|---|---|---|
| त्या च्या ध | ना स म | ग के व | ळ ना श | पा ही |
| - - U | - U U | U - U | U - U | - - |
| त | भ | ज | ज | ग ग |

**खालील ओळींचे गण पाडा.**

अ) फेकी रसाल तरुही मधुगंधपाश.

आ) मातीत ते पसरले अति रम्य पंख.

## मालिनी

**वृत्ताची लक्षणे**

अ) एकूण चार चरण असतात.

आ) प्रत्येक चरणात 15 अक्षरे असतात.

इ) यती 8 व्या अक्षरावर असतो.

ई) या वृत्ताचे गण- न न म य य असे पडतात.

उदा., पखरण बघ घाली भूवरी पारिजात,
परिमल उधळी हा सोनचाफा दिशात;
गवतहि सुमभूषा दाखवी आज देही,
धरणि हरितवस्त्रा मालिनी साजते ही.

ध र णि ह रि त व स्त्रा मा. लि नी सा ज ते ही

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ध र णि | ह रि त | व स्त्रा मा | लि नी सा | ज ते ही |
| U U U | U U U | - - - | U - - | U - - |
| न | न | म | य | य |

**खालील ओळींचे गण पाडा.**

अ) अविरत पथि चाले, पांथ नेमस्त मानी -

अ) वचनि मननि त्याच्या, ध्येय हे एकटावे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 6 वाक्प्रचार

**खांद्याला खांदा लावणे डोळे उघडणे.**

| खांद्याला खांदा लावणे | डोळे उघडणे |
|---|---|
| 1. प्रत्यक्षात आपला खांदा दुसऱ्याच्याखांद्याला लावणे.<br>2. सहकार्य करणे. | 1. झोप पूर्ण झाल्यावर डोळे उघडणे.<br>2. आपली चुक समजून घेणे. |

- शिक्षकांनी अशा विविध उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांशी गट चर्चा करावी. शब्दश: होणारा अर्थ व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेला शब्दसमूहातील फरक लक्षात आणून दयावा. भाषेत असे काही शब्द वा शब्दसमूह येतात की त्यांचा शब्दशः अर्थ घेऊन चालत नाही रूढीने किंवा परंपरेने त्यांना त्याच्या मूळ अर्थापेक्षा वेगळाच अर्थ प्राप्त झालेला असावा व तोच भाषेत रुढ होऊन बसतो. अशा रीतीने शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला वाक्प्रचार असे म्हणतात.

**कृती : खालील वाक्प्रचारांचे दोन अर्थ सांग.**

1) आग लावणे अ)................................ आ................................

2) उकळी फुटणे अ)............................. आ.................................

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाच्यार्थ व लक्ष्यार्थ या संकल्पना समजावून सांगाव्यात.

शिक्षकांनी खालील वाक्ये वाचून दाखवावी.

1) महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

2) लाडकी लेक सासरी जाताना बाबांना गहिवरून आले.

3) शाहू महाराजांनी लोक कलावंतांच्या गुणांची कदर केली.

4) वर्गात सहलीची नोटीस आल्यावर मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# काही वाक्प्रचार आणि त्याचे अर्थ

| | | |
|---|---|---|
| गयावया करणे | - | केविलवाणी विनंती करणे |
| अंगाचा तीळपापड होणे | - | अतिशय संतापणे |
| पगडा बसवणे | - | छाप,प्रभाव पडणे |
| मूग गिळणे | - | अपमान सहन करून गप्प राहणे |
| नामानिराळे राहणे | - | अलिप्त राहणे |
| चारी मुंडया चित होणे | - | संपूर्ण पराभव होणे |
| राम राम ठोकणे | - | निरोप घेणे |
| आकाश पाताळ एक करणे | - | आरडाओरड करणे |
| कां कू करणे | - | एखादी गोष्ट करण्यास तयार नसणे |
| आभाळ फाटणे | - | मोठे संकटे येणे |
| इडापिडा टळणे | - | संकट जाणे |
| परिपाठ ठेवणे | - | सवय ठेवणे |
| ब्रह्मांड कोसळणे | - | मोठे संकट येणे |
| कागाळी करणे | - | तक्रार करणे |
| खांदा देणे | - | मदत करणे |
| जीव मुठीत घेणे | - | घाबरणे |
| पदर पसरणे | - | याचना करणे |
| पाणउतारा करणे | - | अपमान करणे |
| वाली नसणे | - | रक्षणकर्ता नसणे |
| हिरमुसणे | - | नाराज होणे |
| पांग फेडणे | - | ऋण फेडणे |
| डोके सुन्न होणे | - | काही न सुचणे |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| धिंडवडे निघणे | - | फजिती होणे |
| माया पातळ होणे | - | प्रेम कमी होणे |
| हातपाय गळणे | - | धीर सोडणे |
| सुगावा लागणे | - | अंदाज येणे |
| डोक्यावर घेणे | - | कौतुक करणे |
| हातावर तुरी देणे | - | फसविणे |
| बेगमी करणे | - | साठा करणे |
| सोन्याचा धूर निघणे | - | चांगली परिस्थिती येणे |
| अकलेचा खंदक | - | मूर्ख मनुष्य |
| उंटावरचा शहाणा | - | मूर्खपणाचा सल्ला देणारा |
| श्री गणेशा करणे | - | प्रारंभ करणे |
| कळीचा नारद | - | भांडण लावणे |
| कानाडोळा करणे | - | लक्ष न देणे |
| जीव टांगणीला लागणे | - | चिंताग्रस्त होणे |
| नाकी नऊ येणे | - | बेजार होणे |
| डोळे उघडणे | - | पश्चाताप होणे |
| पारा चढणे | - | खूप रागावणे |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

7

# म्हणी

मनुष्याला येणारा अनुभव एखाद्या छोटया वाक्यात मांडून दाखविलेला असतो. लोक अशी वाक्ये नेहमी व्यवहारात बोलताना वापरतात. लोकांच्या नेहमी म्हणण्यात येणारी म्हणून त्याला ‘म्हण’ असे म्हणतात. सर्वांच्या बोलण्यात येणारे चिमुकले, चटकदार, बोधप्रद व सर्वसामान्य वचन म्हणजे ‘म्हण’ अनेकांना येणारा अनुभव एकजण आपल्या शहाणपणाने छोटया सिध्दांत स्वरूप सूत्रमय वाक्यात मांडून दाखवितो. सर्वांकडून त्याला मान्यता मिळते. आणि ती म्हण लोकरूढीत येते, म्हणून ‘मौखिळ वाङमय किंवा अनुभवाच्या खाणी असेही म्हणतात. नमुन्यादाखल काही निवडक म्हणी त्यातून व्यक्त होणाऱ्या विचारासह खाली दिलेल्या आहेत विद्यार्थ्यांनी अभ्यास करून त्यांचा वापर करावा.

1) अग अग म्हशी मला कुठं नेशी - मनात इच्छा असताना वरवर नकार दर्शवणे.

2) अंथरूण पाहून पाय पसरावे - स्वतःची कुवत पाहूनच खर्च करावा.

3) अति शहाणा त्याचा बैल रिकामा - जास्त शहाणपणाने नुकसान करून घेणारा माणूस.

4) आधी पोटोबा मग विठोबा - प्रथम स्वार्थ, मग परमार्थ.

5) आपलेच दात आपलेच ओठ - चूक करणारे आपले व शिक्षा देणारेही आपलेच.

6) आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते - मेहनत एकाची, फळ दुसऱ्याला.

7) आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास - आधीच काम करण्याची इच्छा नसणे त्यातच काहीतरी निमित्त काढणे.

8) इकडे आड, तिकडे विहीर - दोन्ही बाजूंना सारखीच अडचण.

9) उथळ पाण्याला खळखळाट - फार अल्पज्ञानाची बडबड,

10) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग - अति उतावळेपणा करणे.

11) एक ना धड भाराभर चिंध्या - सर्व गोष्टी एकदम करणे चांगले नाही.

12) ऐकावे जनाचे करावे मनाचे - इतरांचा सल्ला घेतला तरी मनाला पटेल तेच करावे.

13) कानामागून येणे तिखट होणे - थोडयाच दिवसात वरचढ होणे.

14) कर नाही त्याला डर नाही - जो वाईट करीत नाही त्याला भिण्याचे कारण नाही.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

15) करायला गेला गणपती झाला मारुती - एक करायला जावे तर भलतेच होणे.

16) कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही - दुसऱ्याच्या वाईट चिंतनाने कार्य हानी होत नाही...

17) कावळा बसायला व फांदी मोडायला एकच गाठ - तात्कालिक हलक्या कारणासही महत्त्व येणे.

18) कामापुरता मामा - गरजेपुरते गोड बोलणे.

19) काखेत कळसा गावाला वळसा - जवळच असलेली वस्तू सापडत नाही म्हणून जगभर शोधणे.

20) कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच - दुर्जन आपला हेका सोडत नाही.

21) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ - स्वजनाचा स्वजन घातकी.

22) कोल्हा काकडीला राजी - क्षुद्र माणसे लहान वस्तूनेही खूष होतात.

23) कोल्ह्याला द्राक्षे आंबट - प्रयत्नाने साध्य न झालेली गोष्ट वाईट.

24) कोळसा उगाळावा तितका काळाच - वाईट गोष्ट वाईटच असणे.

25) खाण तशी माती - बीजासारखेच अंकुर येणार.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

8

# निबंध

**निबंधांचे प्रकार 5 आहेत.**

1. वर्णनात्मक निबंध  2. व्यक्तिचित्रणात्मक निबंध  3. आत्मवृत्तात्मक निबंध
4. कल्पनाप्रधान निबंध  5. वैचारिक निबंध

## 1. वर्णनात्मक निबंध

वर्णनात्मक निबंध म्हणजे एखाद्या वस्तूचे, प्राण्याचे, पाहिलेला प्रसंग यांचे आपल्या शब्दात वर्णन करणे यालाच वर्णनात्मक निबंध म्हणतात.

**उदाहरणार्थ :** माझी शाळा, माझे गाव, माझा आवडता ऋतु, माझे बाबा, माझा आवडता खेळ, माझा शाळेतील पहिला दिवस, आदर्श गाव, श्रवणातला रिमझिम पाऊस, मराठी असे आमची मायबोली, साक्षरतेचे महत्व, शाळेची सहल, माझा प्रवास, माझा आवडता छंद, माझी बहीण, माझी आई.

## 2. व्यक्तिचित्रणात्मक निबंध

एखाद्या व्यक्तीवर केलेले संपूर्ण वर्णन म्हणजे व्यक्तिचित्रणात्मक निबंध.

**उदाहरणार्थ :** माझा आवडता कलावंत, माझे आवडते शिक्षक, माझा आवडत नेता, माझा आवडता नट / नटी इत्यादि .

## 3. आत्मवृत्तात्मक निबंध

या निबंध प्रकारा मध्ये सजीव व निर्जीव वस्तु आपणच आहोत व आली व्यथा, मनोगत, गाऱ्हाणे स्वतः मांडत आहोत असे समजून लिहावे.

**उदाहरणार्थ :** झाडाची आत्मकथा, मी नदी बोलत आहे, सैनिकाची आत्मकथा, मी मोबाइल बोलत आहे, दगडाची आत्मकथा इत्यादि.

## 4. कल्पनाप्रधान निबंध

एखाद्या गोष्टीची कल्पना करून ती कल्पनेमध्ये घडलेले बदल, परिस्थिती यांचे वर्णन करणे म्हणजे कल्पना प्रधान निबंध होय.

**उदाहरणार्थ :** इंटरनेट बंद झाले तर...., झाडे नसतील तर, बोर्ड परीक्षा नसती तर, मी पक्षी झालो तर .., मी प्रधानमंत्री असतो /असती तर .. इत्यादि.

## 5. वैचारिक निबंध

दिलेल्या विषयावर आपले विचार मांडणे यालाच वैचारिक निबंध म्हणतात.

**उदाहरणार्थ :** मोबाइल शाप की वरदान, इंटरनेट शाप की वरदान, तंत्रज्ञान शाप की वरदान, भ्रष्टाचार एक भीषण समस्या, वेळेचे महत्त्व.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 9 मुद्यांवरून गोष्ट

1. प्रथम दिलेले मुद्दे शांतपणे वाचणे.
2. लक्षपूर्वक वाचावेत.
3. त्या आधारे कथेचा आशय लक्षात घेऊन गोष्ट क्रमवार जुळवावी.
4. त्यानंतर गोष्ट लिहावी.
5. गोष्टीतील पात्रांना नावे द्यावीत.
6. गोष्ट साधारणपणे भूतकाळातच लिहावी.
7. गोष्टीला समर्पक शीर्षक द्यावे.
8. शेवटी गोष्टीचे तात्पर्य लिहावे.
9. गोष्टीची भाषा सोपी, साधी व सुटसुटीत असावी.
10. शक्यतो गोष्टी व संवादांचा योग्य ठिकाणी उपयोग करावा.
11. गोष्टीचा आरंभ व शेवट परिणामकारक असावा.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## नमुना

**गोष्टीचे मुद्दे :**

**उदाहरण :-** एक अरण्य - वनाचा राजा सिंह -सर्व प्राण्यावर त्याचा दरारा-सिंह म्हातारा झाला-सर्व प्राण्यांची सभा - सिंहाचे सर्व प्राण्यांना आवाहन - रोज एका प्राण्याला बोलविले - सशाची वेळ - सिंह रागावतो. ससा भीतीने थरथरतो - सिंहाला सशाने दुसऱ्या सिंहाची गोष्ट सांगितली -सिंहाला दुसऱ्या सिंहाला पाहायचे असते -ससा सिंहाला विहिरीजवळ घेऊन जातो-सिंहाला पाहून सिंह गर्जना करतो-सिंहाचा अंत-सशाचे कौतुक.

**वरील मुद्यावरून खालील गोष्ट तयार केली आहे.**

एका अरण्यात एक सिंह राहत होता. सिंह म्हणजे वनाचा राजा. सगळ्या प्राण्यांना त्याचा खूप दरारा. पण सिंह म्हातारा झाला होता. त्याच्याने बाहेर पडून शिकार करणे जमेना. त्याने सर्व प्राण्यांची सभा घेतली. त्यांना तो म्हणाला, "हे पहा, मला तुम्हाला उगीच मारायला आवडत नाही. त्यापेक्षा तुम्हीच रोज एकाने माझ्याकडे या. माझे पोट भरेल, की झाले! मी काही उगाच कोणाला मारणार नाही." यावर सर्व प्राणी गप्प. त्यांना हे मान्य करण्यावाचून गत्यंतरच नव्हते.

रोज एक एक प्राणी सिंहाच्या गुहेत जाऊ लागला सिंहाला आयती शिकार मिळू लागली. एक दिवस सशाची पाळी आली त्याने विचार केला, "याप्रमाणे अरण्यातील सर्व प्राणी संपून जातील यावर काहीतरी इलाज काढायला पाहिजे." तो मुद्दाम इकडे तिकडे रमत गमत उशिरा सिंहाकडे पोचला. वनराज चांगले संतापले होते. ते गरजले, “काय रे ससुल्या ? तुला इकडे येण्याची वेळ माहित नाही का? किती वेळ वाट पाहायला लावलीस? ससा थरथर कापत म्हणाला, महाराज काय करू? वाटेत एक वनराज म्हणाला, आता खातो तुला. मी कशीबशी सुटका करूननिसटलो आणि तुमच्याकडे आलो तेव्हा सिंह म्हणाला “काय? या माझ्या साम्राज्यात दुसरा कोणी सिंह आलाय? चल, दाखव कुठे आहे तो सिंह.” ससा लगबगीने निघाला.

ससा पुढे सिंह मागे. एका भल्या मोठया विहिरीजवळ ससा थांबला. म्हणाला, “महाराज हा पहा दुसरा सिंह.” सिंहाने विहिरीत वाकून पाहिले तर त्याला त्याचे प्रतिबिंब दिसले. अगदी त्याच्या एवढाच मोठ्ठा. त्याला पाहून सिंहाने मोठयाने गर्जना केली. आणि रागाने झेप घेतली. आणि सिंह विहिरीत पडला, आपली चूक त्याच्या लक्षात आली पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सिंहाला विहिरीच्या पाण्यातून बाहेर येणे शक्य नव्हते.त्याला तेथेच प्राण सोडावे लागले. जंगलातील सर्व प्राण्यांनी सशाचे कौतुक केले. आभार मानले त्याने सर्वांचे प्राण वाचवले होते ना ! सर्वजण म्हणू लागले - खरेच "शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ."

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## खालील मुद्यांवरून गोष्ट लिहा.

- **गोष्टीचे मुद्दे**

1. **दोन मित्र -** एका पायाने अधू - कामासाठी गावाला - जंगलातून रस्ता - विश्रांतीसाठी झाडाखाली - अचानक अस्वलाशी गाठ - बचावासाठी एक मित्र झाडावर - दुसऱ्याच्या मदतीसाठी याचना - मित्राचे दुर्लक्ष - असहाय्य मित्र युक्तीने - स्वतःची सुटका- पहिला खजील

2. **मुद्दे :**

   जांभळाच्या झाडावर माकड-झाडाखाली मोठे तळे-तळ्यातील मगरीबरोबर माकडाची दोस्ती -माकड रोज मगरीला जांभळे देई - गोड जांभळे खाणारे माकड किती गोड - ते खाण्याचा मगरीला मोह -माकडाला घरी येण्याचे निमंत्रण- मगरीच्या पाठीवर बसून माकड निघाले - तळयाच्या मध्यभागी गेल्यावर माकडाकडे त्याच्या काळजाची मागणी - ते तर घरी विसरले - आणण्यासाठी माकड परत झाडावर - युक्तीने जीव वाचवला.

# 10 प्रसंगलेखन

सृजनशीलतेला वाव देण्याकरिता तसेच लेखन अभिरुची वाढावी या दृष्टीने प्रसंग लेखन करण्यासाठी इथे विचार करण्यात आला आहे.

प्रसंगलेखन करताना काय करावे ते खाली दिले आहे.

1. तुम्हाला दिलेल्या चित्राचे निरीक्षण करावे.
2. प्रसंगाचे विचारपूर्वक लेखन करणे.
3. दिलेल्या चित्रावरून प्रसंगाची कल्पना करा, तो प्रसंग तुम्ही पाहिला आहे अशी कल्पना करा आणि स्वतःच्या शब्दात त्या प्रसंगाचे वर्णन करा.
4. प्रसंगाचे निरीक्षण करून त्याचे वर्णन करताना तो प्रसंग जणू काही तुम्ही स्वतः पाहिला आहे असे तुमचे प्रसंगलेखन वाचताना वाचणाऱ्याला वाटले पाहिजे.

**1. खालील चित्र पहा व तुमच्या शब्दात प्रसंग लेखन करा.**



**2. खालील चित्र पहा व तुमच्या शब्दात प्रसंग लेखन करा.**



NOT TO BE REPUBLISHED

# 11 संवादलेखन

1) संवाद हा दोन व्यक्तींमध्ये होतो.

2) दोन व्यक्ती एकमेकांना भेटल्या की त्यांचे बोलणे सुरू होते. त्या एकमेकांना कुशल विचारतात. माहिती देतात, माहिती घेतात. त्या वेळी विषय आशयाचे, वेळेचे कोणतेच बंधन नसते.

3) आपल्या मनातील भावभावना दुसऱ्यापर्यंत पोहोचवणे आणि दुसऱ्याच्या मनातील भावभावना समजून घेणे, हेच कार्य संवादात चालू असते

4) संवादांमुळे दोन मने जोडली जात असतात. अशा दोन व्यक्तींमध्ये होणाऱ्या बोलण्याला संवाद म्हणतात

5) कधी कधी विशिष्ट विषयावर, विशिष्ट निर्णय घेण्यासाठी, निश्चित दिशेने, निश्चित सूत्रानुसारही बोलणे होते. यालाही संवादच म्हणतात. हा संवादाचा दुसरा प्रकार आपल्या अभ्यासक्रमात अपेक्षित आहे.

6) येथे संबंधित विषयाचा सर्व बाजूंनी विचार केलेला असावा. तसेच, बोलणाऱ्या व्यक्तीचे वय, तिचे स्थान यानुसार तिच्या तोंडी शोभेल अशी भाषा हवी. संवादात वाक्ये लहान, सुटसुटीत असावीत. शेवटी निष्कर्ष प्राप्त व्हावा.

7) एकच व्यक्ती सलगपणे जास्त बोलते, असा संवाद लिहू नका. प्रतिसाद देत-घेत संवाद घडला पाहिजे.

8) भाषा तुमची स्वत:ची वापरा. मात्र ती असभ्य व अवमानकारक असू नये

9) कोणाचीही जात, धर्म, भाषा, प्रांत यांची टिंगलटवाळी करणारे शब्द संवादात टाळा.

10) संवाद आटोपशीर असावेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## खालील संवाद लेखनाचा नमुना पहा

दहावीच्या वार्षिक परीक्षेचा शेवटचा इतिहासाचा पेपर झाल्यानंतर परीक्षा खोलीतून दोन मित्र अजित आणि अभय बाहेर पडल्यानंतर दोघातील संवाद

अजित :- अभय इतिहासाचा पेपर तुला कसा गेला?

अभय :- मला इतिहासाचा पेपर एकदम सोपा गेला.

अजित :- अरे तुला पेपर कसा गेला?

अभय :- मलाही पेपर सोपा गेला.

अजित:- निकाल लागल्यानंतर कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घेणार?

अभय :- मी सरकारी पदवीपूर्व महाविद्यालयात विज्ञान शाखेत प्रवेश घेणार आहे.

अभय :- अजित, तू कोणत्या महाविद्यालयात प्रवेश घेणार आहेस?

अजित :- मी ही त्याच महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेणार आहे.

अभय :- बर झाल, मला फारच आनंद झाला. तुझी सोबत असली की दिवस मजेत जातो.

अजित :- आता सुट्टीत काय करणार आहेस?

अभय :- सुट्टीत मामाच्या गावी जाणार आहे.

अभय :- तू सुट्टीत काय करणार आहेस.

अजित :- नाही रे, मी आई वडिलांना शेतीच्या कामासाठी मदत करणार आहे.

अभय :- छान आहे. मग मी पण आई बाबांना शेतीच्या कामासाठी मदत करतो. तुझी कल्पना मला आवडली.

अजित :- अरे! माझ्या बसची वेळ झाली. जातो.

अभय :- जा. पण फोन करत रहा.

अजित :- निश्चितच फोन करेन

अभय :- सुट्टीत गावी ये दोन दिवस मजेत राहू

अजित :- निश्चितच येतो

अभय :- ठिक आहे. मी जातो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## • खालील संवादलेखन पूर्णकरा •

एका मित्राचा वाढदिवस. (दोन मित्रांमधील संवाद)

प्रदीप : काय करायचं कळतंच नाही मी कंटाळलोय रे!

संदीप : ..........................................................................

प्रदीप : अरे, आपल्या निखिलचा वाढदिवस आहे ना, परवा ?

संदीप : अरे, हो रे! मीसुद्धा हैराण झालोय. काल मी ग्रिटींग ग कार्डाच्या दुकानात गेलो होतो. दर वेळेला तीच तीच

वाक्ये, त्याच त्याच ओळी, बोअर झालो, ते बघून बघून !

प्रदीप : मग काय करू या रे!

संदीप : ........................................................................

प्रदीप : अरे पण, सर्वांना आवडली पाहिजे ना!

संदीप : एरवी तरी कुठे सगळ्यांना खरोखर आवडतं ? वाढदिवसाच्या वेळी सर्वजण "वा! वा! सुंदर!" म्हणतात पण कोणीही एकदाही त्या ग्रिटींग कार्डकडे वळून पाहत नाही.

प्रदीप : हे मात्र खर रे!

संदीप : या वेळी आपण असं करू. आपण निखिलला एक रोपटं भेट देऊ

प्रदीप : ......................................................................................... !

संदीप : मी सांगतो बघ. सगळ्यांना आवडेल ही भेट. आणि तुला माहीत आहे? ठरावीक दिवसांनी त्या

रोपट्याला अंकुर फुटतात. अंकुरांचा तो कोवळा निर्मळ पोपटी रंग पाहताना मन मोहून जातं. असं वेगवेगळ्या प्रसंगी निखिल आनंदी होईल

प्रदीप : ..................................................................................................................

©MSBTB NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम**

- **खालील दिलेल्या विषयावर संवादलेखन करा.**

1. तुमच्याशाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. स्नेहसंमेलनाच्या तयारी संदर्भात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद तुमच्या शब्दात लिहा.

2. तुमच्याशाळेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे. या संदर्भात दोन मैत्रिणींचा संवाद तुमच्या शब्दात लिहा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED